# प्रकरण तिसरे

# 'झळ' आणि 'आग' या कादंबऱ्यांचे अभिव्यक्तीविशेष

# प्रकरण तिसरे

# ‘झळ’ आणि ‘आग’ या कादंबऱ्यांचे अभिव्यक्तीविशेष

## प्रास्ताविक :

दुसऱ्या प्रकरणात बाबुराव गायकवाड यांच्या ‘झळ’ आणि ‘आग’ कादंबरीतील आशयविशेष व रचना यांचा विचार केला. आता या प्रकरणात प्रस्तुत कादंबरीतील आशयाची अभिव्यक्ती कादंबरीच्या विविध घटकांच्या आधारे कशी झालेली आहे ते पाहू.

बाबुराव गायकवाड ह्यांच्या ‘झळ’ या कादंबरीमधून लेखकाने आर्थिक परिस्थितीला तोंड देत, परिस्थितीवर मात करीत,दु:खाच्या हरेक घटनेला तोंड देत, शेशू आपले जीवनमान शिक्षण घेऊन कसे उंचावतो. तसेच परिस्थितीवर मात करीत पुढे मार्गक्रमण करत असलेला दिसतो. हे मुख्य कथासूत्र घेऊन विस्तृतपणे बाबुराव गायकवाड यांनी ‘झळ’च्या माध्यमातून दाखविण्यात यशस्वी झालेले आहेत.

‘झळ’ या कादंबरीमधून एका गरीब दरिद्री कुटुंबाचे आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गोष्टीला बळी पडलेल्या घटनेमधून त्या कुटुंबाची घडलेली शोकांतिका लेखकाने शब्दबद्ध केले आहे. त्यांनी या कादंबरीची सुरुवातच इतर दलित कादंबरीपेक्षा वेगळ्या पद्धतीने केलेली आहे. ‘झळ’ या कादंबरीचा नायक म्हणून शेशू हा कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. शेशूची परीक्षा संपली असली तरी देखील तो इतर मित्रांच्याप्रमाणे पैशाअभावी सुट्टीला गावी जाऊ शकत नाही. केवळ आर्थिक परिस्थिती या एकमेव कारणामुळे बी.ए. ची परीक्षा संपवून तीन ते चार वर्षानंतर गावी जाण्याचा विचार करीत असलेला दिसतो. शेशू बऱ्याच दिवसांनी शिक्षण घेऊन गावी गेल्यावर उमापूर या गावामधील लोक त्याच्या नीटनेटक्या कपड्याकडे बघून नाक मुरडीत होती. हे बघणं शेशूच्या लक्षात येऊन देखील

तो आपल्या घराकडे जात होता. कॉलेजची परीक्षा संपवून शेशू गावाकडे सुट्टी घालविण्यासाठी आलेला असतो. परंतु त्याला दार उघडून आत प्रवेश करताच आवाजाच्या दिशेने अंजना आजी शेशूकडे धाव घेते. वडील वारल्याची दु:खद घटना त्याला सांगते. या दु:खाने हताश होऊन वृक्ष उन्मळून पडावा तसा तो जमिनीवर कोसळला. स्वत:च्या गावापासून शिक्षण घेणेकरीता लांब असल्याने परिस्थितीमुळे वडिलांच्या मृत्यूची वार्ता शेशूला वेळेत समजली नाही. पण तो ज्यावेळी घरी पोहोचतो तेव्हा वडिलांच्या मृत्यूची दु:खद घटना शेशूला समजल्यानंतर जगायचं आता कुणासाठी जगायचं ? का चित्तेत उडी घ्यायची ? का वडिलांच्या चितेत उडी घ्यायची ? असे अनेक प्रश्न त्याच्या प्रत्येक अश्रूमधून जीवनातील प्रत्येक प्रसंग आठवू लागला. इथूनच कादंबरीमधील एक-एक प्रसंग उलगडून सांगण्यास सुरुवात केली आहे.

बरेच दिवसांनी घरी आलेल्या शेशूला दु:खाची बातमी कळते. त्यावेळी त्याच्या मनात अनेक नकारार्थी विचार येतात. तेव्हा तो मरणाचा देखील विचार करतो. अशावेळी त्याला सावरण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्याची प्रेयसी रुना करते. त्यावेळी ती म्हणते 'शेशू तू माझ्यासाठी जग' आईनंतर मीही या जगात पोरकीच आहे. अशा तऱ्हेने या कादंबरीचे कथासूत्र या दोन पात्रांच्या भोवतीने अवतरलेले आहे.

'झळ' या कादंबरीत स्त्रीपात्रे ही या कथाविषयाला अनुसरुन आलेली आहेत. या कादंबरीमध्ये शेशूची आई रंभेचे वर्णन आलेले आहे. गरिबीवर मात करीत शेशूच्या वडिलांबरोबर संसार करीत आहे. परंतु रुनाच्या वडील (आण्णा) ला गोळी घालून मारल्याच्या कारणावरून शेशूच्या वडिलांना अटक झाल्याने संसाराला कलाटणी मिळाल्याचे जाणवते.

'झळ' या कादंबरीमध्ये शेशूच्या भावाची असफल प्रेमाची कहाणी हे एक दुसरे उपकथानक कादंबरीत भर घालत असल्याचे दिसते. भाऊ घरातील वातावरणाला बेजार

होऊन दुसऱ्या ठिकाणी पडेल ती कामे करून परगावी राहत असतो. त्याचवेळी मिलेटरी भरती करण्यासाठी साहेब आले असता त्याची प्रथम निवड केली जाते. मिलेटरीत भरती झाल्यानंतर कॅप्टन बरेवानेंची मुलगी बेला हिचे प्रेम भाऊवर जडते. पण आईच्या कुकृत्यामुळे तिची भेट घालू न देता रानात शिकारीला गेले असताना रंभा व धोंडू दिमाखे हे दोघे एकत्र आले असता भाऊनी बंदुकीची गोळी धोंडूवर झाडली पण धोंडू खाली बसल्यामुळे बंदूकीची गोळी थेट आईवर (रंभा) बसली. हे सर्व पाहून बेला भाऊला दुषने देत पळून जाते. अशा पद्धतीची असफल प्रेमाचे आणखी एक उपकथानक आले आहे.

'झळ' या कादंबरीमध्ये रुनाच्या घराण्याची दुरावस्था झालेली आहे. ते असे की, जमुनाची आई भागा ही केवळ जातीमुळे जालीम नावाच्या व्यक्तीला बळी पडते. तिच्यावर जबरदस्ती करून आपली वासना भागवितो. त्या वासनेतून जमूनाचा जन्म होतो. पण गंगा ही 'जालीमबरोबर एकनिष्ठ राहून तमाशामध्ये काम करू लागते.'

'जमूना' ही गंगा या तमासगिराची मुलगी असल्याने तिला खालच्या पायरीचे समजले जाते. या कारणास्तव रुनाला देखील खालच्या पायरीची म्हणून समाजात हिणवले जाते. अशा प्रकारचे हे ही या कांदबरीत दारिद्रयामुळे, जातीयतेमुळे बळी पडलेले उपकथानक मांडण्यात लेखक यशस्वी झालेले आहेत.

**कथारचना :**

'झळ' या कादंबरीची सुरुवात शेशूच्या दु:खद प्रसंगापासून झाली आहे. घरची गरिबी, दरिद्रीपणा यामुळे जीवन असह्य होत असताना देखील शेशू त्याला तोंड देत दिवसामागून दिवस घालवत असतो. कधी कधी उपाशीपोटी दिवस घालविलेले आहेत. शेशूची घरची परिस्थिती अत्यंत दरिद्री असल्यामुळे तो अनेक दिवस गावी जाऊ शकत नाही. परीक्षा संपल्याने सर्व मित्रमंडळी गावी जाण्यासाठी निघतात आणि आपण परत सर्वजण एम.ए. च्यावेळी भेटू असे एकमेकांच्यात संभाषण चालू असताना याचवेळी

शेशूला अनेक प्रश्न भेडसावत. कारण बी.ए. पर्यंतच्या शिक्षणासाठी स्कॉलरशीप होती म्हणून कसा तरी शिकला. परंतु येथून पुढचे शिक्षण कसे करावयाचे या प्रश्नाच्या चक्रात सापडला होता. याचवेळी रुनाच्या सुखमय आठवणी येऊन त्याला दु:खाची आठवण होत नसे.

कॉलेजच्या सुट्टीमध्ये शेशू घरी येतो पण वडिलांच्या निधनाने उद्ध्वस्त होतो. त्यावेळी रुना त्याला सावरल्याने आपण दोघे जीवन जगायचे असे निश्चित करतात. बाबुराव गायकवाड यांनी कादंबरीची सुरुवात ही खरोखरच चांगल्या रीतीने केली आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. कारण 'पाच वर्षाची मुलं शाळेत घाला हो ऽऽ अशा वेसकराच्या दवंडीने सुरुवात झाली. यावरून लेखकाला समाजात बदल करण्याकरीता शिक्षणच महत्त्वाचे साधन आहे असे वाटून समाजाने शिक्षणाची कास धरायला हवी असेच लेखकाला सांगावयाचे आहे असे वाटल्याशिवाय राहत नाही.'

या कादंबरीचा नायक शेशू वेसकराच्या दवंडीमुळे शिक्षण घेण्याकरीता शाळेत जाण्यास तयार झाल्यावर ठेवलेला पाटीचा तुकडा बाबांनी स्वच्छ करून दिला. यावरून शिक्षणाविषयी असणारी आस्था किती आहे हे जाणवून येते . शेशू शाळेत जातो. शाळा ही मारूतीच्या पाटावर भरत असे. त्याठिकाणी गेल्यावर शेशूला जातियतेचे दर्शन होते कारण महारामांगांना खाली ओट्यावरच बसावे लागे. वरील संदर्भावरून तत्कालीन समाज व्यवस्थेत जातीयता किती होती हे दिसून येते.

शेशूचे वडील दुसऱ्याच्या रानात काम करून घर प्रपंच चालवित असत. त्यातूनच शेशूच्या शिक्षणाचा खर्च भागवत असत. एकदा चोरीच्या वेळी धोंडो दिमाख्यावर झाडलेली गोळी रूनाच्या आण्णाला लागली. या गोळीबारात आण्णा मरण पावल्याने त्याचा आरोप शेशूच्या वडिलांवर होऊन अटक होते. अशा या प्रसंगाने सुखाने चाललेला प्रपंच उद्ध्वस्त होण्याला कारण होऊन घराचे बेघर झाले. तुरूंगातून

सुटल्यानंतर घरी येतात पण स्वत:ची बायको दुसऱ्याच्या घरी असल्यामुळे हताश होऊन घरातून निघतात. काही दिवस एस.टी.स्टँडवर हमाली करता करता मृत्यू होतो. यावरून भारतीय समाज व्यवस्थेतील जातीयतेमुळे शेशूच्या वडिलांना जन्मापासून ते अंतापर्यंत कष्ट करून जीवन कंठत असलेले पहावयास मिळते. हे सर्व घटना प्रसंग गरिबीमुळेच वाट्याला आले असून गरिबीची 'झळ' सर्व कुटूंबाला बसून नटलेला संसार कसा उध्वस्त होतो याचे वर्णन या कादंबरीत आलेले आहे.

शेशूच्या वडिलांना कोर्टातून सोडवून आणतो म्हणून धोंडो दिमाख्याने रंभाला जवळ करून तिला स्वत:चीच करून घेतली. गरिबीमुळे सुखी संसार कसा रसातळाला जातो याचे चित्रण 'झळ'या कादंबरीत आले आहे. तसेच दारिद्रयाची झळ किती वाईट असते याचे वर्णनही यामध्ये आले आहे. यानंतर वर्णन येते ते रुना व शेशू हे दोघे एकाच शाळेत असतात. त्यांचे एकमेकांवर जीवापाड प्रेम बसलेले असते. रूना ही खालच्या पायरीची आहे असे वडील म्हणतात. यावेळी शेशूला प्रश्न पडतो. खालची पायरी व वरची पायरी तरी कुठे दिसत नाही. मग वडील तसे का म्हणाले याचा विचार शेशू करीत असतो. याचे कारण असे आहे की, रूना ही जमुनाची मुलगी. जमुना ही गंगाची मुलगी असते. गंगा ही आपल्याच जातीची पण तिला जालीम याने जातीयतेचे दडपण आणून तू मला शिवलीस ही बातमी गावात सांगून तुला मारायला लावणार याची भीती घालून जालीमने तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला आणि पुढे त्यातूनच जमुनाचा जन्म झाला. पोटाचा प्रश्न सोडविण्याकरिता गंगा तमाशात काम करते पण ती जालीमशी एकनिष्ठ राहते. परंतु तमाशावाली म्हटले की अनेक व्यक्तींशी संपर्क येत असतो. या कारणास्तव ती आपल्यापेक्षा खालच्या पायरीची आहे असे म्हणून शेशूचे वडील हिणवण्याचा प्रयत्न करतात.

रूना ही शेशूच्या जातीची असून देखील खालच्या पायरीची कशी ? यावरून असे दिसते की समाजातील जातियता किती खालच्या थराला जावून पोहोचली आहे. एकंदरीत एकाच जातीतील माणसांच्याकडे बघण्याची तुच्छतेची दृष्टी दिसते. अशा प्रकारचे वर्णन लेखकाने आणून आपल्याच जातीतील लोकांच्याकडे देखील किती तुच्छतेने पाहतात. हे दाखवून देण्याचे कार्य केले आहे.

'झळ' या कादंबरीत दुसरे एक उपकथानक गुंफले आहे. ते म्हणजे शेशूचा मोठा बंधू 'भाऊ' हा कष्टाळू, स्वाभिमानी, तटस्थ व करारी स्वभावाचा आहे. त्याचे व रंभाचे पटत नसते. कारण आई ही आई नसून कैदासिन आहे. आईने कुकृत्य केल्यामुळे तिला आई तरी कसे म्हणावे असे त्याला वाटते. या दोघांच्यामध्ये लेखकाने संघर्ष घडवून आणलेला आहे. अशा या आईला शेवटी भाऊने स्वत:च्या प्रियेसीला दाखविण्यासाठी आणले असता. रानात शिकारीला गेले असताना बंदूकीची गोळी झाडली. स्वत:च्या आईवर गोळी झाडून एक प्रकारचा सूडच घेतो. त्यावेळी रंभा रक्ताच्या थारोळ्यात पडते. हे सर्व पाहून भाऊची प्रेयसी बेला रस्ता मिळेल त्या बाजूने पळून जाते. अशा वेळी भाऊ तिला थांब म्हणून बेलाच्या पाठीमागून जातो. पण त्याचा काही उपयोग होत नाही. तो तसाच एकटा राहतो. यामधून लेखकाने आईच्या प्रेमाला पोरका झालेला व दुसऱ्या बाजूला प्रियेशीच्या प्रेमाला पोरका झालेला व दुसऱ्या बाजूला प्रियेसीच्या प्रेमाला मुकलेला दाखवून भाऊचे व्यक्तिमत्व ना घर का ना घाट का अशी अवस्था दाखवून उभे केले आहे. हे सर्व कृत्य गरिबीमुळेच झाले तेही दाखवून देण्यास लेखक कमी पडलेला नाही, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

'झळ' कादंबरीच्या उत्तरार्धात शेशू शिक्षण घेवून घरी येतो. तेव्हा तो वडिलांच्या मृत्यूची दु:खद बातमी ऐकून हताश होतो एवढेच नाही तर तो स्वत: विषाची बाटली पिणार असतो. त्याचवेळी शेशूची प्रियेसी रूना तेथे येऊन त्याला समजावून सांगते. तू

माझ्यासाठी जग, त्यावेळी शेशूला आधाराचा हात मिळाल्यामुळे त्याला घालविण्याचे ठरवून जमुनाकडे आशीर्वाद घेण्यासाठी येतात. येथे कादंबरीचा शेवट बाबुराव गायकवाड यांनी केलेला आहे.

**'आग' कादंबरीचे कथानक :**

'आग' कादंबरीची सुरूवात ही एस.टी.तून मधू आपल्या धावडी या गावी येतो अशी झाली आहे. या प्रसंगी एस.टी.तील वातावरणाचे लेखन केले आहे. खेड्याचे वर्णन करून वातावरण ग्रामीणमय भागातील केले. मधू धावडीत जात असताना लुळाण्णा मधूच्या बॅगा घेऊन मागोमाग चालू लागला.

'धावडी' गावची रचना ही पाणंदीच्या वरच्या बाजूला सवर्णांची व खालच्या बाजूस महार व मांगांची घरे होती. महारवाडा आणि मांगवाडा यात अर्ध्या फर्लांगाचे अंतर होते. होलेरवाडा आणि चांभारवाडा धावडीच्या दक्षिणेस सुमारे अर्ध्या फर्लांगावर होता. पाचशे घरांच्या धावडीत महारांची वीस, मांगांची दहा-बारा, तर होलेर व चांभारांची मिळून दहा घरे होती असे 'आग' या कादंबरीमध्ये गावचे चित्रण आलेले आहे.

धावडी गावातील आपल्या लोकांच्या वाट्याला गरिबीचे जीवन का आले हा शिकलेल्या मधुला पडलेल्या प्रश्नाभोवती ही कादंबरी गुंफण्यात आलेली आहे. 'आपल्या तीनही वाड्यात शेती का नाही ? आपला समाज दरिद्री कसा राहिला ? आपल्या माणसांनी जमीन जुमल्यासाठी कधी प्रयत्नच केला नाही ? आपल्या माणसांनी हाताशिवाय दुसरं जगण्याचं साधनच नाही. पण दुसऱ्या समाजातील माणसांनी हातपाय न हालवताही पिढ्यान पिढ्या जगण्याची सोय करून ठेवली. याबाबत ब्राह्मण फार चतुर म्हणावे लागतील. पोथी पुराण-पंचांग सांगून या प्रकारे बारा महिने पुजा-पाठ करून दक्षिणा उकळणारा ब्राह्मण म्हणजे खंडणी वसूल करणारा जुलमी बादशाहच भारतीय

समाजव्यवस्थेची उतरंड कुण्या बिनबुडाच्या मनूने लिहिलेली होती. असे अनेक विचार मधूच्या डोक्यात घोळत असतात.'

दलितातील जातीजातीमध्ये भेदभाव हा प्रश्नही या कादंबरीत मांडला आहे. याचे विश्लेषण या कादबरीत येते. आड महारांचा म्हणून कोणताच मांग पाणी पीत नव्हता. अस्पृश्य असल्यामुळे वाट्याला आलेले शिवाशिवीचा प्रश्न यामध्ये मधुला दिसतो.

'आग' कादंबरीतून कातकरासारखे दलित पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन आपल्याच माणसांच्या डोळ्यात धूळ घालतात. याचा देखील वेध या कादंबरीतून घेतलेला आहे. कातकरासारख्यांना नवीन नेतृत्व पुढे येत असताना त्यांचे मन दुखावले जातेच. पण नवीन नेतृत्व पुढे येऊ देत नसतात. असे कादंबरीत पहावयास मिळते.

धावडी गावातील सवर्ण लोक तो मग सरपंच असो अगर गावचा पाटील असो, ही गावातील प्रमुख व्यक्ती असून देखील गरीब दलित लोकांच्यावर अन्याय करतात याचे सविस्तर वर्णन या कादंबरीत बाबुराव गायकवाड यांनी केले आहे.

डॉ. बाबुराव गायकवाड यांनी या कादंबरीत मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव द्यावे म्हणून नामांतर चळवळ सुरु झाली होती त्याचे विस्तृत वर्णन या कादंबरीद्वारा केले आहे. लेखकाने हा महत्त्वाचा मुद्दा मांडला असून या नामांतर चळवळीत दलित व सवर्ण एकमेकाविरूद्ध जिद्दीने कंबरा कसून लढत होते. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर प्रकरण ही या देशातील अस्मिता जागृत झालेल्या एका समाजाची वैचारिक लढाई आहे. या लढाईची या समाजाला फार मोठी किंमत चुकवावी लागली. या पार्श्वभूमीवर नामांतराचा लढा तीव्र स्वरुपाचा लढला गेला. त्यामुळे सगळा मराठवाडा जणू रणांगण बनला होता. हा महत्त्वाचा मुद्दा लेखकाने वाचकांच्या निदर्शनात आणून दिला आहे.

लेखकाने या कादंबरीमध्ये खेडे व शहर यामधील फरक अप्रत्यक्षरीत्या दाखवून दलित समाजातील व्यक्तींना खेड्यातून शहराकडे चला हा संदेश याद्वारे केला आहे.

या कादंबरीतील भाषा ही साधी, सरळ असून मराठवाड्यातील ग्रामीण बोलीचा वापर केला आहे. तसेच या कादंबरीतील पात्राच्या तोंडची भाषा ही विषयाला अनुसरुन आली आहे. या सर्व कारणामधून कादंबरी ही यशस्वी झाली आहे असे वाटते.

**'झळ'मधील पात्रचित्रण :**

कादंबरीला कथानक आवश्यक असते. कादंबरीत पात्रचित्रण आलेले असते. प्रत्येक व्यक्तीची व्यक्तिगत वैशिष्ट्ये असतात. यामध्ये स्वभाव, रुपाची, वर्तनाची, वेगवेगळी वैशिष्ट्ये असतात. व्यक्ती कादंबरीत नायक, नायिका, खलनायक अशा भूमिकेतून वावरत असते. या स्वभाववैशिष्ट्याने व्यक्ती आपल्या डोळ्यापुढे चित्रित होते. पात्रचित्रण हा कादंबरीतील महत्त्वाचा घटक मानला जातो.

'झळ' या कादंबरीत पात्रे मोजकी आलेली असली तरी ती कादंबरीचा आशय विस्तृत करणारी आहेत. या कादंबरीतील पात्रे योग्यवेळी आपापल्या भूमिका पार पाडणारी आहेत. 'झळ' कादंबरीत आलेली पात्रे ही त्यांच्या आशयानुसार वैशिष्ट्यपूर्ण अशीच आलेली आहेत. या कादंबरीमध्ये अनेक पात्रे घेऊन गुंतागुंत न करता मोजकीच पात्रे घेऊन कादंबरीचे कथानक उलगडताना दिसते. कमी पात्रे घेऊन कादंबरीला एक प्रकारचा उठावदारपणा आणण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

**शेशू...**

'झळ' या कादंबरीतील महत्त्वाचे पात्र शेशू हे असून याच्या भोवतीच कथानक गुंफले आहे. 'झळ' या कादंबरीचा केंद्रबिंदू शेशू हा आहे. या कादंबरीची सुरुवात शिक्षणाची वार्ता येथून होते. ही वार्ता ऐकून शेशूचे वडील त्याला शाळेत घालतात. पण

त्याच्याजवळ पाटी नसते. त्यावेळी वडील त्याला जुनी पाटी काढून देतात. अशी शेशूच्या जीवनाला सुरुवात झाली आहे.

'शेशू' शाळेत जातो त्याला शिक्षणाची आवड निर्माण होऊन तो शिक्षण घेऊ लागतो. त्यानंतर कॉलेजच्या शिक्षणाच्यावेळी माहिती नसलेल्या शहरात प्रवेश करतो. कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतो. पुढच्या वाटचालीस सज्ज होतो. कॉलेजमध्ये असताना अनेक कार्यक्रमात भाग घेतो. वर्गात पहिला नंबरही अनेक वेळा येतो. तसेच तो अनेक कार्यक्रमात सहभागी होत असल्याने अनेक मुली त्याच्यावर छाप पाडण्याचा प्रयत्न करीत असतात. पण त्याला तो न जुमानता रुनालाच निवडतो. यावरून त्याच्या मनाची एकनिष्ठता दिसून येते. तसेच शेशू हा एक होतकरून मुलगा आहे हे प्रत्ययास येते.

शिक्षणाची आवड निर्माण होऊन शिकत असताना त्याला अनेक दु:खाना सामोरे जावे लागले. त्याने उपासपोटी दिवस काढले. यावरून त्याच्या मनात असलेली शिक्षणाविषयीची आस्था किती आहे हे दिसून येते. त्याच्या घरी गरिबी आहे. तरी देखील त्याच्यावर मात करून शिक्षण पूर्ण करतो. फक्त शिक्षण पूर्ण करून न थांबता आपण काहीतरी समाजाचे देणे लागतो या जाणिवेतून तो समाजकार्य व राजकारण करावयाचे ठरवितो. पण हे करीत असताना त्याला नोकरीची जोड असली पाहिजे तरच आपण करू शकतो हे शेशू ओळखून असतो. त्यामुळे प्रथमथ: आपण शिक्षण घेऊन नोकरी हे करावयाचे ठरवितो.

शेशू ज्यावेळी रुनाबरोबर नाटक करतो अनेक वेळा तिच्या बरोबर असल्यामुळे वडील म्हणतात की, ''तू रुनाबरोबर असे नाटक करतो तू काय तिच्याबरोबर लग्न करणार आहेत. पण मी तुला रुना बरोबर लग्न करू देणार नाही. कारण ती खालच्या पायरीची आहे.''[१]

यावरील वाक्यावरून शेशूच्या मनात प्रश्न निर्माण होतो की, आपण वावरत असताना पायऱ्या तर कुठे दिसत नाहीत. पण वडिलांनी रुनाला खालच्या पायरीची कशी म्हणाले. यावरून शेशू किती विचारवंत आहे हे दिसते. तसेच तो मानवतेच्या दृष्टीनेच रुनाकडे पाहताना दिसतो. रंभा (शेशूची) आई ज्यावेळी रानातून येते त्यावेळी तिची तो बारकाईने चौकशी करताना आढळतो. यावरून शेशूची चौकसदृष्टी पहावयास मिळते.

शेशू हा समजदार असल्याने त्याला आपल्या घरची परिस्थिती माहित आहे. आपले वडील दुसऱ्याच्या शेतात मजुरी करून आपल्याला पैसे देतात. त्यामुळे त्या पैशाचा वापर बेताने व योग्य कारणासाठी करतो. एकेक वेळी उपासपोटी राहून दिवस ढकलताना दिसतो.

गरिबीत देखील संसार करणाऱ्या आपल्या वडिलांचे त्याला बरे वाटायचे पण रुनाच्या आण्णाला गोळी लागल्याने बाबांना तुरुंगवास भोगावा लागतो. यामुळे शेशू फार दु:खी होतो. तो बी.ए. चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बऱ्याच दिवसांनी घरी जातो. पण त्याला जाण्यासाठी उशीर होतो. दरवाजा उघडतो. त्या आवाजाने अंजना आजी येते आणि म्हणते, ''तुझे नशिबच फुटके की रं ! मरतेसमयी पर तुझं हात त्याच्या मातीला लागलं नाहीत.'' अशी वडिलांच्या मृत्यूची बातमी ऐकल्यानंतर तो हताश झालेला दिसतो. अशावेळी त्याला एकच प्रश्न पडतो की, आता कुणासाठी जगायचे ? असा हा शेशू या प्रसंगी दु:खी झालेला, हताश झालेला, जगण्याची इच्छा नसलेला, वडिलांवर किती प्रेम करीत होता हे दिसते. शेशूचा मोठा बंधू भाऊ हा शिक्षणाकरीता पैसे पाठवित असतो. भाऊ हा स्वाभिमानी विचाराचा पक्का आहे. तो शेतामध्ये मोलमजुरी करतो. कोणतेही कष्ट करताना मागे न सरता करतो. नंतर तो मिलेटरीत भरती होतो व शेशूला शिक्षणाकरीता पैसे पाठवित असतो. शेशू व भाऊ दोघेही एकमेकांची काळजी करतात. यावरून त्यांचे असणारे बंधू प्रेम पहावयास मिळते. या सर्वांवर नजर फिरविली तर शेशू हा

गरिबीवर मात करणारा, चौकस बुद्धीचा, शिक्षणाची तळमळ असलेला, समाजात बदल घडवू पाहणारा, जातियतेच्या बाहेर बघून मानवतेची दृष्टी ठेवणारा, रुनाबरोबर एकनिष्ठ असलेला, कोणत्याही गोष्टीला बळी न पडता आपल्या विचाराशी ठाम असलेला दिसतो. शेशू हा अशा अनेक कलागुणांनी संपन्न असलेला 'झळ' या कांदबरीचा नायक होय. म्हणूनच शेशू हा या कादंबरीचे मुख्य पात्र आहे. वरील कलागुण अवगत असल्याने तो आपल्यासमोर नानाविविध रुपाने समोर येतो.

**रुना :**

रुना ही 'झळ' या कादंबरीतील महत्त्वाची स्त्री भूमिका पार पाडणारे पात्र आहे. ही कादंबरी रुना व शेशू यांच्या प्रेमाची कथा यातून पहावयास मिळते. बालपणातील शाळेपासून ते तिला स्वीकारणेपर्यंतचे सर्व वर्णन या कादंबरीतील कथानक गुंफण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

रुना व शेशूचे घर जवळ होते. त्यामुळे बालपण खेळण्यासाठी एकमेकांच्या घरी ये-जा असायची. शाळेत ही जाऊ लागले. महादेवाच्या जत्रेतील नाटक या दोघांना आवडल्याने रुना व शेशू हे नाटक आपल्या समाजातील लोकांच्यासमोर केले हे पाहून लोक कौतुक करू लागले. पण इकडे वडिलांचे डोके तापून ते म्हणाले की, ''रांडीच्या खालच्या पायरीच्या पोरीबरोबर असं खेळतुयास ?''[२] शेशूला तर पायऱ्या कुठेच दिसत नव्हत्या. मग वरची पायरी व खालची पायरी असं काय रुनाविषयी म्हणत होते. असा प्रश्न शेशूला पडतो. शेशू हा रुनाच्या घरी जेवण करून आला म्हणून वडिलांनी शेशूला मार दिला हे ऐकून रुना दु:खी झालेली पहावयास मिळते.

रुनालाही शिक्षणाविषयी अत्यंत आवड होती. शेशूनेही शिक्षण घेण्यासाठी सांगितलेले असते. त्याकरीता रुना आपल्या गावाहून दुसऱ्या गावाला शाळेला जात असते. शाळा शिकण्यासाठी लागणाऱ्या पैशाअभावी शिक्षण होऊ शकणार नाही म्हणून

रुना आठवड्यातून एक-दोन दिवस कुणाच्याही शेतात मजुरी व बाकीचे दिवस ती शाळा करीत होती. असे दिवस काढून शिक्षण घेताना दिसते. अशी रुना शिक्षणाकरीता धडपड करीत असताना दिसते. रुनाचे शेशूवर अत्यंत प्रेम असल्या कारणानेच ती दोन वेळा त्याला भेटून येते. अनेकवेळा त्यांच्या प्रेमाविषयी आणाभाका घेतल्या होत्या. त्या विश्वासावर रुना शेशूची वाट पाहत दिवस कंठत असते.

रुनाची परिस्थिती गरिबीची असताना सुद्धा शिक्षण घेत होती. शाळेला जाण्यासाठी तिला परगावी जावे लागतअसे. एके दिवशी तिची मैत्रिण आली नव्हती. ती रस्त्यावरून एकटी चाललेली असताना देविदास सारखा तरुण रुनाच्या वाटेत स्वत:हून पुस्तक टाकतो. ते सापडलेले पुस्तक रुना त्याला परत करताना देविदास म्हणतो की, ह्यातीलपाच रुपयाची नोट कुठे आहे असा तो तिच्यावर खोटा आरोप करतो. आपणावर विनाकारण आळ घेतो हे तिने ओळखले. 'रुने तू लबाड बोलतेस ? मला तुझं दप्तर पाहू दे, म्हणून तो जवळ गेला. तू कुठेतरी साडीमध्ये लपविलं असशील ?' असे म्हणत त्याने पदराला धरण्याची कोशिश केली. तोच एक चापट त्याच्या गालावर बसली. अशा या देविदासला रुना प्रतिकार करते. पण शेवटी जे व्हायचे ते होते. 'रुनावर त्याने अन्याय केला इतकी रुना महारमांगाचे झालोत म्हणून गावाला वेडावू नये' असे म्हणायला देखील कमी करीत नाही. तिच्या प्रमाणिकपणाचे वर्णन दिसते. रुनाला सापडलेले पुस्तक ते देविदासला परत करते. पण त्याचे फळ म्हणजेच तिच्यावर अन्याय होतो.

रुनाच्या उदरात वाढलेला अंकूर तिने खुडून त्याला मुठमाती देण्यासाठी स्मशान भूमीत जाते. त्यावेळी शेशू भेटतो आणि म्हणतो, एवढ्या अंधारी तू इथे कशी काय आलीस यावेळी रुना म्हणते, 'तुझी प्रकृती त्या खिळग्यात ठेवून जगाला व तुला कायमची विसरणार होते. किती वाट पाहू म्हणून तिने विषाची बाटली तोंडाला लावली. तोच एक चपराक तिच्या गालात मारली. रुना तुला आई आहे. म्हाताऱ्या आईला सांभाळण्यासाठी

तू जग. मला या जगामध्ये कुणी नाही. मी कशासाठी जगायचं मी जातो. म्हणून तोंडाजवळ बाटली नेली. तोच रुनाने उडी मारुन गळ्याला विळखा घत्तला. 'शेशू माझ्यासाठी जग आईनंतर मीही या जगात पोरकीच आहे. आपल्या दोघांची जोडी पाहून आई खूष होईल असे रुना शेशूला समजावून सांगते. पुढील आयुष्याची वाटचाल करण्यासाठी आपण दोघांनी एकत्र आले पाहिजे. म्हणून ती दोघेही विचार करून जगण्यासाठी एकत्र येतात.'

शेशू म्हणाते की, एवढं शिकूनही नोकरी मिळत नाही. आपण कशावर जगायचं ग रुना ? त्यावेळी रुनाने दिलेले उत्तर म्हणजे जगण्याची दिशाच दाखवून देते व म्हणते, 'आपले हात दणकट असताना विचार करण्याची काय गरज ? दोघांचे हात सरसर हालू लागले. म्हणजे कशाला कर्मी पडायचे नाही.' अशी ही रुना बालपणातील शाळेपासून ते माझ्यासाठी जग म्हणून भावी आयुष्यात एकत्र जोडीत राहूया अशी ती धाडसाने सांगणारी कृतीशील स्त्री आहे.

रुना ही प्रेमळ, कष्टाळू, जिद्दी, एकनिष्ठ, संकटांना सामोरी जाणारी स्त्री, शिक्षणाविषयी आवड असलेली म्हणून तिचा उल्लेख करावा लागेल.

**शेशूचे बाबा (वडील) :**

शेशूचे वडील हे अनेक वर्षापासूनच्या चालत आलेल्या मांगजातीमुळे गरिबीचे हाल सोसत, आपला प्रपंच दुसऱ्याच्या रानात मोलमजुरी करून चालवत असताना दिसतात. घरी गरिबी असल्यामुळे बाबा (शेशू) चोरी करण्यासाठी जायचे. पण ही चोरी केलेली आपल्या मुलांना कळू न देण्याची दक्षता घेतात. चोरी करून आल्यावर देखील आपल्या साथीदारांना म्हणतात की, ''आवाज करू नका. लेकरांच्या कानी जायला नगं.''[३] अशी काळजी घेतात.

वडिलांच्यामध्ये असणारी शिक्षणाविषयीची तळमळ सुद्धा दिसते. कारण शेशूला शाळेत पाठवत असताना जुनी पाकाडातील पाटी काढून पुसून स्वच्छ करून शेशूला दिली व त्याला शाळेत पाठवतात. हजारो वर्षापासूनची जाती बरोबर आपल्याला ही गरिबी आली आहे असे वाटून त्यांना ते ग्यानबाविषयी रागाने म्हणतात की, ''आयला यांची बैलं कुठं तरी लांब नेऊनशिन्या कापायला पाहिजेत. लईच तोऱ्यात येतूया.''[४] या विधानावरून त्यांच्या मनात असलेला राग आपणास पहावयास मिळतो आणि हा सर्व प्रसंग जातीमुळेच आलेला आहे असे वाटते.

बाबा (शेशू) च्या वर्तनातून जातीयतेचा अभिमान दिसतो. कारण बेंदराच्या दिवशी तोरण बांधण्यावरून झालेला वाद हा जातीयतेचे दर्शन घडवून देतो. यावरून त्यांच्यातील परंपरावादी वृत्ती दिसते. पण अशा सणावाराच्या दिवशी आप पल्यात भांडणेही होताना दिसतात या कादंबरीत देखील शेशूच्या वडिलांचे व रुनाचे वडिलांचे (आण्णांचे) बेंदूर या सणाच्यावेळी तोरण बांधण्यावरून भांडणे झालीत. यावरून जातीचे खोलवर परिणाम झालेले आहेत असे दिसते.

शेशूचा मोठा भाऊ देखील दुसऱ्याच्या शेतात राबत असलेला दिसतो. घरच्या गरिबीमुळेच त्याला दुसऱ्याच्या रानात कामाला जावे लागते असे काम प्रत्येक दिवस चालत होते याची खंत वडिलांना वाटते.

भारत, चीन यांच्या युद्धाच्यावेळी सरकारने मिलेटरी भरती सुरु केली असता मिलेटरीचे सायब उमापुरातील तरुणांना मिलेटरीत भरती करून घेऊन जातात. अशा प्रसंगी बाबांची अवस्था मन भरून येते. आपली घरची परिस्थिती चांगली असती तर आपण मुलाला मिलेटरी भरती करू दिली नसती. स्वत:पासून लांब जाऊ दिले नसते अशी खंत व्यक्त करतात.

प्रत्येक वडिलांची अपेक्षा असते की, आपल्या मुलाचे लग्न डोळ्यासमोर व्हावे. याला शेशूचे बाबाही अपवाद नाहीत. त्यांना वाटत असते की, मुलाच्या सुखासमाधानाचा काळ हा त्याच्या आईला शोभणारी सून घरात आली असती. हां हां म्हणता घर लेकराबाळांनी फुलूनं गेलं असतं. वय होऊनही मुलाचे लग्न करू शकलो नाही म्हणून बाबांच्या अंत:करणात याविषयी कालवाकालव झालेली पहावयास मिळते. त्यामुळेच मुलगा मिलेटरीत गेल्यावर बाबा मात्र छपरीत येऊन रड रड रडतो. या ठिकाणी वडील म्हणून बाबांना असे वाटणे साहजिकच आहे. नाहीतरी कोणत्या व्यक्तीला वाटते की, आपला मुलगा बरोबरीचा होऊन स्वत:ला सोडून जावावा. ही दु:खद घटना असल्यानेच बाबा हे सर्व गरिबीमुळेच झाले अशी खंत व्यक्त करतात.

अशा अनेक दु:खांना बाबांना सामोरे जावे लागले. बाबांना दोन फळांची मोठी आशा होती. ती म्हणजे शेशूकडून व भाऊंच्याकडून त्यांना मोठी अपेक्षा असते. आपली मुले शिकून मोठी झाली पाहिजेत अगदी मोठ्या घरच्या लोकांच्यासारखी झाली पहिजेत, ही वडिलांची आशावादी दृष्टी दिसते. शेवटी उतरत्या वयात बाबा हे अनेक संकटांना सामोरे जात असताना स्वत: जगण्यासाठी स्वाभिमानाने दुसऱ्याच्या दावणीला न पडता हमाली करून दिवस काढणारे कष्टाळू वृत्तीचे दिसतात. यावेळी हमाली करताना २१ वर्षांच्या तरुणात व बाबा यांच्यात संवाद चालतो. 'बाबा तुम्ही अशी हमाली का करता?' 'मुलुखाची गरिबी नव्हं का ? पोटं भरायला खेड्यामंधी धंदे नाह्यती म्हणूनशान हमालीच करून पोट भरतोया.' या विचारावरून तत्कालीन काळात ग्रामीण भागामध्ये व्यवसाय उद्योगधंदे नव्हते. त्याकरीता खेड्यातील लोकांना पोटाची आग भागविण्यसाठी तालुक्याच्या, शहराच्या ठिकाणी यावे लागत असे.

वरील अनेक अंगाने शेशूच्या बाबांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू दिसतात. गरिबी असताना देखील त्याच्यावर मात करून जगताना दिसतात. शिक्षणाची तळमळ

असल्यानेच शेशूला पाटी स्वच्छ करून देतात. पोटाच्या भुकेसाठी दुसऱ्याच्यात काबाडकष्ट करतात. तसेच जातीयतेचा अभिमान अंगी असलेला दिसतो. म्हातारपणी देखील हमाली करून प्रत्येक दिवसाला सामोरे जातात. म्हातरपणी दुःखाचे दिवस आले असताना देखील आपल्या मुलांच्याकडून आशावादी दृष्टी ठेवली आहे.

बाबांच्या मनात अविचाराचा एक शब्दही बाहेर पडू न देणारे, रागाचा टेंबाही न आणणारे, धीर व गंभीरपणाची ती मूर्ती असे कादंबरीत वडिलांचे वर्णन आले आहे.

**रंभा (शेशूची आई) :**

'झळ' या कादंबरीत शेशूची आई रंभा ही कादंबरीच्या सुरुवातीस ती हळूहळू येत असताना दिसते. मुलाला पावसात न खेळू देणारी, घर प्रपंचासाठी शेतात मूग काढायला गेलेली, मुलाला वडील मारत असताना शांत रहा म्हणून सांगून झालेली जा असे सांगणारी, एक सुखाचा संसार करून घर सुरळीत चालविणारी स्त्री रंभा ही आपणास 'झळ' कादंबरीत दिसते.

रंभा ही घरकाम करण्यात गुंग असायची. पण एक दिवस नियतीचा घाला येतो. रुनाचे वडील आण्णा याला गोळी लागल्यामुळे त्यातच त्यांचा मृत्यू झाला म्हणून शेशूच्या वडिलांना अटक होते. येथून ह्यांच्या प्रपंचाला घरघर लागलेली दिसते. शेशूच्या वडिलांना सोडवून आणतो असे खोटे सांगून धोंडोने रंभाशी जवळीक केली. "मी तुझ्या नवऱ्याला पैसे देऊन सोडवून आणतो. परंतु तू कायमची माझ्या बाहुपाशात राहिली पाहिजेस."[५] असे त्याने वचन घेतले होते. या गोष्टीला बळी पडून रंभा जीवनात उध्वस्त होताना दिसते. हे घडत असताना अनेक लोकांच्यात चर्चा होत असते. त्यांच्याकडे लक्ष न देता रंभा ही धोंडो दिमाखाच्या वाड्यात राहायला जाते. त्यामुळे तिने आदर्शाची लक्तरे टांगलेली दिसतात.

स्वत:च्या आड येणाऱ्या मुलीला म्हणजेच सोमीला वारंवार त्रास देत होती. रानात मायलेकी गेल्या असताना विहिरीतील पाणी पिण्याकरीता गेल्या असताना सोमीचा तोल गेल्याने विहिरीत पडते. येथे तिचा मृत्यू होतो. या ठिकाणी लेखकाने कादंबरीत वाचकांना विचारक्रांत करावयास लावले आहे. कारण सोमीला तहान लागते. पण त्याचवेळीआईने (रंभाने) सोमीला शिवी हासडली. कार्टी, मरत तरी नाही. तहानेनं जणू हिचा जीव जातोय. अगं बघतीस काय ? घे की पोवरा असे म्हणून रंभाने सोमीला ढकलले ? की तिचा तोल जावून मेली हे न सांगता रंभाने आरडा ओरडा करून माणसांना बोलावू लागली. तेवढ्यात सोमी पडून गतप्राण झाली असे दाखविण्यात लेखक यशस्वी झाला आहे. परंतु या ठिकाणी गरिबीमुळे वाट्याला आलेले जीवन दुसऱ्याला देऊन स्वत:च्या मुलीला मारणारी क्रूर आई या ठिकाणी दिसते.

जिवाचं रान करून पोशीत असलेला व अखेर घरासाठीच कैदेत मृत्यूच्या क्षणासारखे एकेक क्षण कंठीत असलेला एकेकाळी वाघापेक्षाही उग्र, हत्तीपेक्षाही धिप्पाड व तीक्ष्ण माणूस रंभाने नरम करून त्याला जीवनातून उठविले होते. जन्माची जोडीदारीण कामवासनेनं आंधळी झालेली, माणसासारख्या माणसाला लाथाडून दुऱ्याच्या उकीरड्यावर पडणारी, दुसऱ्याच्या जीवनाचं वाटोळं करणारी कलंकिनीच ती ! असे वाटल्याशिवाय राहत नाही. कारण स्वत:च्या नवऱ्याला बाजूला सारुन दुसऱ्या व्यक्तीबरोबर राहणे म्हणजे किती समाज विघातक कृत्य तिच्या हातून घडले आहे. तिच्यातील असणारा स्वाभिमान नाहीसा झाला आहे.

काही ठिकाणी ती शेशूला चोरून पैसे देते. रंभा ही बदफैली वर्तन करीत असताना जरी दिसत असली, समाज विघातक कृत्य करीत असली तरी देखील तिला हे सर्व घरच्या असलेल्या गरिबीमुळेच करणे भाग पडत असते. रंभाला पैशाचे आमिष

दाखवून, रानातील धान्याचे आमिष दाखवून तिला वश करताना धोंडोसारखी श्रीमंत व्यक्ती गरीब माणसांच्यावर अन्याय करताना दिसते.

रंभा ही जरी धोंडो दिमाखेसारख्याच्या आहारी गेली असली तरीही ती अनेक वेळा काम करीत असताना दिसते. बऱ्याच वेळा ती घरकाम करतानाही आढळते. भाऊ मिलेटरीतून येऊन परत जात असताना रस्त्यावरून जाणाऱ्या भाऊकडे आई शेजारणीसारखी पाहू लागली. बोलावं असं वाटूनही बोलू शकली नाही. कितीही झालं तरी आईची माया ती मायाच ! घळघळा डोळ्यांतून अश्रू ढाळू लागली. यावरून रंभाच्या हृदयात मुलांविषयी असणारे प्रेम दिसते. आई म्हणून असणारी वात्सल्याची जाणीव येथे पहावयास मिळते.

मुलांना वाईट चोरीचे वळण लागू नये म्हणून अंजना आजी बोलत असताना रंभा तिच्या तोंडावर हात ठेऊन म्हणते, 'शेशू घरातच आहे. लेकरांपुढे असं बोलू नये. मोठेपणी तेच शिकल' म्हणून बोलणे आवरत घेणारी मुलांना वाईट वळण लागू नये म्हणून काळजी करणारी दूरदृष्टीची असणारी आई (रंभा) होय. आई म्हणून असणारे कर्तव्य पार पाडणारी, निभावणारी रंभा दिसते.

वरील गुणावगुणावरून रंभा ही दरिद्री अवस्थेत संसार करणारी, कष्टाळू आहे. त्यामध्ये समाधान मानणारी संसारीक स्त्री, शरीराने बांदेसूद, वात्सल्यमय, मुलावर प्रेम करणारी रंभा हे पात्र कादंबरीतआगळ्या वेगळ्या रुपाने आलेले दिसते. म्हणून रंभा ही कादंबरीत नानाविध असणाऱ्या गुणावगुणांनी आपल्या डोळ्यात भरणारे महत्त्वपूर्ण असेच पात्र आहे.

**भाऊ ..**

या कादंबरीतील भाऊ हा शेशूचा मोठा बंधू असून तो खासगी शाळेत शिकत असतो. भाऊला लिंबूर (हुरडा) खाण्याची इच्छा होते. पण तेथे भाऊला रंभा व धोंडो

एकत्र पाहून त्याची तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याने सर्व वडिलांना सांगितले. तेव्हापासून रंभा त्याच्यावर रागाला येत होती. या त्रासाला कंटाळून 'भाऊ असल्या आईचं तोंडही पहाणार नाही' म्हणून तो परगावी गेला आणि शेतीत काम करीत दिवस घालवू लागतो. असा हा भाऊ स्वाभिमानी व कष्टाळू वृत्तीचा आहे.

मिलेटरीच्या साहेबांनी भाऊच्या शरीराकडे पाहून तगडा जवान म्हणून पुकारले त्यावेळी त्याची भरती करून घेतली. भाऊला मिलेटरीत जाऊन दोन वर्षे झाली तरीही तो घरी आलेला नव्हता. आपल्या कौशल्याने नायक होऊन गावी आलेला आहे. पण घरी कोणी नसल्यामुळे तो निराश होतो. बऱ्याच दिवसांनी उमापूरला आलेला भाऊ फिरायला गेला होता. त्याचवेळी उमा या मित्राकडे गेला. पण उमाच्या बायकोने कालवणाने भरलेले मातीचे भांडे भाऊपुढे ठेवल्याने भाऊला एकदम मारल्यासारखे झाले. अजून बाट, शिवाशिवी गावची गेली नाही हे पाहून भाऊला दु:ख होते. अनेक वर्षापासून आलेली जातीयता अजूनही गेली नसयाचे मनोमन दु:ख भाऊला होते. यावरून सवर्ण लोकांचा जातियतेकडे बघण्याचा तुच्छतेचा दृष्टिकोन पहावयास मिळतो.

घरच्या दारुण अवस्थेमुळे लग्नाचे वय होऊन देखील लग्न करीत नव्हता. जवानी जाळणे त्याला भाग पाडले होते. मिलेटरीमधील रणांगणावरील आवाजापेक्षा कर्णभेदक हुकूमी आवाज ऐकून कॅप्टनची थोरली मुलगी बेला व भाऊ जवळ आलेले दिसतात. भाऊ, बेला व कॅप्टन हे कित्येक वेळा सिनेमाला गेले होते. कॅप्टनच्या मर्जीविरूद्ध एकही गोष्ट तो करीत नव्हता. या जास्त काळाच्या सहवासानेच बेलाचे भाऊवर प्रेम जडले होते.

विजयी सैनिकांचा सेंटरतर्फे सत्कार होता. पण कॅप्टन हे भाऊचे वैयक्तिक स्वागत करणार होते. अशावेळी बेलाने कॅप्टनच्या अगोदर ओवाळले. त्याच्या तोंडात पानाचा विडा घालते. तेव्हा कॅप्टननी हे बेलाचे कृत्य पाहून बेलाला अविचारी, भाऊची लायकी काय असे अनेक अपशब्द वापरुन काळजावर घाव घालीत होते. पण भाऊवर बेलाचे

निस्सीम प्रेम असल्याने बेला थोडीही न डगमगता कणखरपणे वडिलांना तोंड देते. याच्यावरून बेलाचे भाऊवर जीवापाड प्रेम होते हे जाणवते.

भाऊला अनेक अपशब्द वापरल्याने नम्रतापूर्वक हात जोडून म्हणाला, जरा मी जातो. मिस बेलाचे माझ्यावर प्रेम असेल अस मला चुकूनही वाटलं नव्हतं ? यौवनाचा सारा खेळ आहे. मी आपल्या आड कधीही येणार नाही. असे म्हणून तो जायला निघतो. यावरून भाऊ किती समजूतदार, कुणाच्याही मनाविरूद्ध गोष्ट असेल तर न करणारा भाऊ मोठ्या वृत्तीचा दिसतो. स्वातंत्र्याविषयी तर भाऊचे मत घेण्यासारखे आहे. तो म्हणतो, ''मनाचे स्वातंत्र्य हे माणसाचे खरे स्वातंत्र्य. त्यावर बंधन घालणारे कोण ? सर्व मरावे पण माणसाचे मन मरू नये असे म्हणतात. मग मी बेलाच्या निष्पाप प्रेमाला मारणारा कोण ?''[६] अशी तत्त्वज्ञानाची भाषा बोलणारा, प्रेमाला महत्त्व देणारा माणसाचे मन मारु न देणारा भाऊ याठिकाणी दिसतो.

भाऊला हुरडा खाण्याची हौस होती म्हणून शेतात जातो. परंतु आई (रंभा) दुसऱ्याच्या बाहुपाशातअसलेली दिसते. त्यावेळी त्याचा राग अनावर होऊन तो म्हणतो, 'रंभा ही माझी आई नसून वैरीण आहे, तिने सात जन्मीचे कुदर्शन घडविले' असे भाऊ म्हणतो.

भाऊला मातीची जाणीव असल्यानेच तो आठवण झाली की गावाकडे येतो. बेला ही भाऊबरोबर आली. रानात गेले असता भाऊला पहिल्या क्षणाची आठवण होऊन त्याचे डोळे लालबुंद होतात. त्याचे मन बोलू लागते की, तुला मायेच्या प्रेमापासून पारखे केले. मातृपितृत्वाला ज्याने मुकविले असा नराधम तुझ्या हातच्या मरणाला आसूसलेला आहे व रंभा (आई) विषयी त्याच्या मनात अनेक प्रश्न भेडसावत असतात. त्या पापी मानसाअगोदर तिच्यावर बार टाकून मोकळा हो. पण तिनेच मला जन्म दिला ? तिला मारुन मातृत्वाचे पाप कोठे फेडू ? असे अनेक प्रश्न भाऊच्या मनात गर्दी करतात. पण

शेवटी धोंडो दिमाखेवर झाडलेली गोळी तो खाली बसल्यामुळे आईला लागल्याने ती रक्ताच्या थारोळ्यात पडते.

अनैतिकतेने वागणारीला मारले तर पाप लागत नाही. असे भाऊ ठाम मत करून आईवर गोळी झाडतो. यावेळी हे सर्व पाहून बेलाने वाट मिळेल तिकडे तिने पळ काढला होता. बेलाला थांबविण्यासाठी भाऊ धावत होता. अशावेळी भाऊ म्हणतो, 'बेला तू म्हणाली होती की सुखादु:खात सोबत सोडणार नाही. तुझ्या पावलावर पाऊल ठेऊन पाठराखण करीन. आता लाथ मारुन पळून का जातेस ?' भाऊ हा प्रेमाला, मायेला आसुसलेला असल्यानेच तो तिला थांबविण्याचा प्रयत्न करतो. मातृत्वाला व स्त्रीप्रेमाला मुकलेला भाऊ बेलाला धरण्याठी धावत होता.

आईवर गोळी झाडतो. पण ते तिच्या कर्माचे फळ मिळाले, जे व्हायचे ते होणारच. माझी अशी हेडसांळ करू नकोस अशी विनवणी करतो. या सर्व प्रसंगाने हतबल झाला आहे. असा हा भाऊ जिद्दी, कष्टाळू वृत्तीचा, निर्भीड, प्रेमळ, स्वाभिमानी आहे.

**बेला :**

बेला कॅप्टन बरेवाची मुलगी आहे. बेला व भाऊ सहवासातून एकत्र येतात. पुढे त्याचे रुपांतर प्रेमात होते. भाऊवर निस्सीम प्रेम करते. बरेवाची बेलाकडून मोठ्या अपेक्षा असतात. एखाद्या डॉक्टरशी लग्न लावून बेलाचा सुखी संसार पहावा म्हणून त्याने बेलाला कॉलेजमध्ये घालतो. पण बेला आपल्या वडिलांच्या स्वप्नाचा भंग करते. बेला व भाऊ यांचे प्रेम वाढतच जाते. दोघेही आणाभाका घेतात. त्यावेळी आयुष्यभर तुला मी सुख दे:खात साथ देईन असे बेला म्हणते. बेला हट्टपणामुळे भाऊच्या गावी जाते. बेलाच्या हट्टीपणामुळे भाऊ तिला गावी घेऊन येतो.

भाऊ व बेला रानात गेले असता आईच्या कुकृत्यामुळे भाऊ रंभाला गोळी घालतो. या कारणाने बेला रस्ता दिसेल तिकडे पळताना, भाऊ तिला थांबविण्याचा प्रयत्न करतो. पण ती थांबत नाही. अशी असफल प्रेमाची कहाणी हे दुसरे एक कथानक या कादंबरीत गुंफले आहे.

अशी ही बेला निस्सीम प्रेम करणारी, वडिलांना कणखरपणे मत देणारी, हट्टी, हळव्या मनाची इ. गुण तिच्यात दिसतात.

**कॅप्टन बरेवा :**

कॅप्टन बरेवा हे बेलाचे वडील आहेत. बरेवा हा कॅप्टन आहे. भाऊ जेव्हा कॅप्टनच्या घरी येतो तेव्हा बेला भाऊला ओवाळते. त्याच्या तोंडात पानाचा विडा घालते. अशावेळी कॅप्टन म्हणतात, 'बेला तू हे काय करीत आहेस ?' कॅप्टनच्या भारदस्त आवाजाने दोघेही गांगारले. 'पपा वयात आलेली प्रत्येक भारतीय स्त्री करते तेच मी करतेय.' बेला बोलून गेली.

पोरी मला न विचारता, त्याची लायकी, आपली इज्जत याचा काही विचार, वाटेल ते कॅप्टन बोलून गेला. कॅप्टन कठोर झाला होता. भाऊ एक साधा शिपाई, पोटापुरत्या पैशावर जगणारा. मी काय स्वप्न पाहिले, एखाद्या डॉक्टरशी तुझे लग्न लावून सुखी संसार पहावा. म्हणून मी तुला कॉलेजला पाठविले. मुद्दामच आतापर्यंत तुझे लग्न केले नाही. आज तू अनजान शिपायाशी प्रेम करतेस, एखाद्या नववधूने वागावे तशी वागतेस.

कॅप्टननी जातीचाही प्रश्न वर काढला, पण तुम्ही असेच जातीला चिकटून बसणार का ? बेला ? व्यवहार व जगात वागणे यात फार मोठा फरक असतो. बोलावर पाऊल ठेऊन चालणाऱ्याच्या फजितीला पारावार नसतो. त्याला समाजातील रस्तोरस्ती फिरणारे

काळं कुत्रंही विचारत नाही. जग जसे झुकेल, तसेच झुकते. माप आपण दिले पाहिजे. हे तुला पुस्तकी शिक्षणातून कसे कळायचे ?

हे सर्व पाहून भाऊ निघत असतो. तेव्हा म्हणतो की, 'मी आपल्या कधीच आड येणार नाही' असे म्हणून तो जायला निघाला तर बेलाच्या डोळ्यांतून अश्रूंची धार वाहू लागली. कॅप्टन बरेवाचे पितृहृदय द्रवले. कॅप्टन हसतच उद्गारले मिस्टर भाऊ बेलाचे मन सांभाळा इत्यादीमधून बराके हे कॅप्टन आहेत पण ते देखील आपल्या मुलीला प्रेमात टाकत असतात. पण तिचे खरे प्रेम पाहून कॅप्टन आपली बाजू कमी घेऊन बेलाला परवानगी देतात. यामधून पितृहृदयाचे दर्शन घडते.

भाऊ म्हणतो, 'सर, मी बेलाच्या बोलण्याच्या बाहेर एक पाऊलही जाऊ शकत नाही. कारण मनाचे स्वातंत्र्य हे माणसाचे खरे स्वातंत्र्य. त्यावर बंधन घालणारे कोण ? सर्व मरावे परंतु माणसाचे मन मरू नये असे म्हणतात. यामधून एका सुशिक्षित माणसाचे विचार कसे असतात हे पहावयास मिळतात. आपल्या मुलीच्या विचाराला होकारार्थी उत्तर देऊन बेलाचा हात भाऊच्या हातात द्यावयाला कॅप्टन बरेवा तयार होतो. यावरून असे दिसते की, आधुनिक काळानुसार विचार करून योग्य तो निर्णय आपल्या मुलीला देतो असे महत्त्वपूर्ण पात्र या कादंबरीत आले आहे.'

**रुनाचे वडील आण्णा :**

आण्णा हे रुनाचे वडील आहेत.हे ही मोलमजुरी करून दिवस घालवित असतात. अनेक कष्टाची कामे करतात. परंपरेने आलेल्या जातीमुळे ते आंबाडा सोलण्याचेही काम करताना आढळतात.

आण्णादेखील जातीयतेने भरडलेल्या अवस्थेत असल्यानेच पोटाच्या खळग्याकरीता चोरी देखील करीत पण अशाच चोरीच्यावेळी आण्णाला बंदूकीची गोळी

लागून मृत्यू पावतो. आण्णा हे खरेपणामुळेच बेंदूर या सणाच्या वेळी एकमेकाच्या वरसलकीच्या तोरण बांधण्यावरून आण्णा व शेशूचे वडील यांच्यात भांडण होऊन हमरी तुमरी झालेली दिसते, असे आण्णा जातियतेला, परंपरेला सांभाळणारे आहेत हे स्पष्ट होते.

अधून-मधून चिमीचेही वर्णन आले आहे. चिमी ही रुनाची मोठी बहिण होय. चिमीचे लग्न होऊन ती मरीमायची पुजा करण्यासाठी येते. त्यावेळचे तिचे वर्णन येते. संसारात गुंतलेली एक स्त्री म्हणून पुढे आलेली आहे. चिमी हे पात्रही या कादंबरीमध्ये भर घालते.

**जमुना :**

जमुना रुनाची आई असून ही कष्टाळू वृत्तीची आहे. संसारामध्ये आपल्या नवऱ्याला साथ देत असते. एक दिवस जमुनाच्या संसाराला घरघर लागते. म्हणजे या ठिकाणी जमुनाच्या नवऱ्याला (आण्णा) गोळी लागून मरण पावतो. असा मोठा धक्का बसल्यानंतर तिचा घरचा आधारच नाहीसा झाला. पण ती त्या गोष्टीला कवटाळून न राहता जगण्यासाठी काहीतरी करीत जगले पाहिजे म्हणून ती कष्ट उपसून एक एक दिवस काढते. कुळाचा दीपच विझला गेला. त्यामुळे जन्माचं वैधव्य भोगावं लागलं.

जमुना ही जशी संसारीक आहे तशी स्वत:च्या मुलीची काळजी घेणारी आहे. रुनाच्या चिंतेत ती वावरताना दिसते. जमुना ही गंगेची मुलगी असल्याने रुनाला खालच्या पायरीची समजली जाते. कारण जालीम नावाच्या पाटलाच्या मुलाने जातीयतेची भीती दाखवून तुझी करणी गावात सांगून मायलेकीची धिंड गावातून काढीन, माझे ऐकशील तर मी तुला परी बनविन. स्वत:च्या अब्रूची धिंड वाचवण्यासाठी गंगाने देहाचे मात्रे करून घेतले. त्यातूनच जमुनासारख्या मुलीचा जन्म होऊन पुढचे दिवस जगण्यासाठी गंगा

तमाशात काम करू लागली. त्यामुळेच रुनाला खालच्या पायरीची म्हणून हीनवले जात होते.

जमुना शेशूला समजाविण्यासाठी भाषादेखील वापरताना पहावयास मिळते. 'शेशू मृग नक्षत्र सुरु झाले आहे. मृगाच्या पहिल्या पावसाच्या धारा पडत आहेत. तुला लागलेली झळ आता नक्कीच कमी होईल' असे म्हणते.

**धोंडो दिमाखे :**

'झळ' या कादंबरीमधील धोंडो दिमाखे हे पात्रही आपल्या निराळ्या वर्तनाने इतरांच्यापेक्षा वेगळे असलेले दिसून येते. धोंडो हा उमापुरातील एक श्रीमंत माणूस असून उंच बांधा, श्रीमंतीमुळे भक्कम राहणारा, तांबड्या पटक्याचा शेला असा पेहराव करणारा आहे.

बाबांची (शेशू) व धोंडोची जबर दोस्ती असल्याने असलं नसलं तो त्यांनी देई. त्यांना धोंडो म्हणजे पक्का विश्वासाचा माणूस पण रंभेच्या जवानीची मशाल अंगात चेतवू पाहणारा असा हा वासना लोलूप माणूस रंभाला रानात आलेल्या गाजर, रताळी इ. काहीही रानातून घेऊन जा असे आमिष दाखवतो. रंभेचा पती तुरुंगात होता. त्याला सोडवून आणतो. म्हणून आमिष दाखवून तिच्या बरोबर लगट करू पाहणारा. आपल्या घराण्याची तमा न करणारा, स्वत:च्या बायकोची काळजी न करता दुसऱ्या स्त्रीत समाधान मानणारा भोगवादी पुरुष पहावयास मिळतो.

रंभाच्या व आपल्या आड येणाऱ्या सोमीचा देखील राग त्याला यायचा पण तो काही करू शकत नव्हता. त्यामुळे त्याने रंभेला सांगून तिच्या वाट्यातून बाजूला करणारा क्रूर माणूस दिसतो. निरापराध बालकाला मारायला लावणारा नराधम वृत्तीची व्यक्ती

कादंबरीत वावरताना दिसते. शोषितांच्या आधारहीन जीवनाचा उच्चभ्रू लोकांनी त्यांच्या दयनीय अवस्थेचा फायदा घेऊन उपभोग घेतलेला आढळतो.

**अंजना आजी :**

अंजना आजीचे या कादंबरीत पात्र येते ते हातात लाकडी टोपली घेऊन अंबाबाईचा जोगवा मागत फिरणारी. आवडता विषय म्हणजे कुठल्याही गप्पा ऐकणे व त्या रंगवून सांगणे. यामध्ये तिला रस आहे.

अंजना आजी ही साठी ओलांडली असेल अशा वयाची होती. तिच्या अडाणीपणामुळेच तिला ही वेळ आली होती. अंजना आजी गावात कुणालाही असेच सांगून उदरनिर्वाह चालविते. जरी अंजना आजीचे वय झाले असले तरी ती जोगवा मागायला फिरते. यावरून तिचा कष्टाळूपणा दिसतो. तसेच शेशू गावाकडे येतो तेव्हा अंजना आजी आवाजाच्या दिशेने पुढे येते व म्हणते काल यायचा नव्हतास यायला थोडा उशीर केलास असे हृदयद्रावक शब्द ती काढते. यावरून तिच्यातील आप्लेपणा, मायाळूपणा जिव्हाळा किती आहे ते दिसते.

अंजना आजीचे वेगळेपण म्हणजे ती देववादाच्या आहारी गेलेली दिसते. त्यामुळे ती अंधश्रद्धाळू आहे. जे वास्तव नाही ते आहे म्हणून चुकीचे सांगताना दिसते. या सर्व गोष्टीला तिच्यात असणारा शिक्षणाचा अभाव कारणीभूत आहे. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**जालीम :**

जालीम हा पाटलाचा मोठा मुलगा आहे. याच्याकडून लेखकाने सवर्ण लोक, श्रीमंत लोक गरीब माणसाला कसे छळतात याचे उदाहरण म्हणजे जालीम आहे. एकदा जालीम असाच शेतात जनावरांकडे आला होता. त्यावेळी जगुनाची आई गंगा ही आंघोळ

करताना दिसते. तेथे गेल्यांनतर गंगाने आपले भिजलेले पातळ पाण्यात टाकते. पण ते जालीमच्या अंगावर पडते. त्यावेळी तो न चिडता म्हणतो, 'गंगा तुझ्याकडे पाहून सारा राग जळून गेला बघ. तुझ्या अंगावरील भिजलेल्या लुगड्याच्या थेंबाने अंग थंडगार केलसं बघ. तुझं मन ही असंच शीतल की शांत असलं पाहिजे.'

'गंगाओरडून उपयोग नाही' मी तुझी करणी गावात सांगून मायलेकीची धिंड गावातून काढीन. माझे ऐकशील तर मी तुला एक परी बनवीन असे खोटे बोलून तिच्यावर अत्याचार करतो. अशी दुष्ट प्रवृत्तीची माणसे देखील समाजात असतात हे दाखविले आहे.

अशा व्यक्तिचित्रणाच्या माध्यमातून लेखकाने या व्यक्तीपासून लांब राहण्याचा सल्ला दिला आहे. रानावनात स्त्रीला एकटी गाठून स्वतःच्या क्रूर वासना शमवायच्या हे उच्चभ्रू लोकांना माहित होते. स्वतःच्या कुळाचा, प्रतिष्ठेचा, पैशाचा वापर, स्वतःचे अत्याचार लपविण्यासाठी ते कसे करत होते यावरती अप्रत्यक्षरित्या लेखक बोट ठेवतो. जालीम सारखी वासनांनी बरबटलेली कामांध माणसं कशी जालीम करतात हे लेखकाने 'झळ' या कादंबरीत दाखवले आहे.

**सोमी :**

सोमी ही शेशूची लहान बहिण होय. हिला कादंबरीत लेखकाने आपले मत मांडण्याकरीता पुढे न येऊ देता तिचे मुकपणेच पुढे आणले आहे. सोमी रंभाच्या आवाजावरून एकदम भिऊन तिने सांगितलेले काम भांडी घासायचे करते. सोमीचा छोटा जीव रंभाला थरथर कापत असलेला दिसतो. अशी ही लहान मुलगी असून हिच्यामुळे आपली नादाळी गेली म्हणून सोमीवर राग काढत होती.

सोमी ही रंभाला अडचण करीत असल्याकारणानेच रंभाने तिला विहिरीत ढकलून मारले. असा हा निष्पाप जीव विहिरीत पडून मरतो. ही गोष्ट चटका लावून जाते. तिवचार करावयास लावते ? सोमीला शेवटच्याच पाण्याची तहान लागली होती वाटतं ? असेच वाटायला लागते. रांडनं चाबरेपणा केला. तुझ्या जिभेला केंडा कसा लागला नाही ग अवदसा ? अशा अनेक शब्दांचा मारा करून सोमीवर आई चिडत असते.

**देविदास :**

'झळ' या कादंबरीतील देविदास हे एक पात्र कादंबरीमध्ये भर घालताना दिसते. देविदास हा पाटलाचा मुलगा रुनाच्या गावातील व तिच्याच शाळेतील होता. याच्या मनामध्ये रुनाविषयी घर केले होते. त्यामुळे ती कधी आपल्या कचाट्यात सापडेल याचीच वाट पाहत होता. एक दिवस रुनाची मैत्रिण शाळेला आली नव्हती. रुना एकटीच रस्ता पार करीत असते. त्यावेळी तिला रस्त्यावर पुस्तक पडलेले दिसते. त्यावरील नाव वाचून ते पुस्तक देविदासला देण्यासाठी रुना भरभर चालत असते. पण हे पुस्तक देविदासने जाणून बुजून टाकले होते.

रुना देविदासला पुस्तक परत करते. पण त्या पुस्तकातील पाच रुपयाची नोट तुच घेतलीस असा तो खोटा आरोप करतो. 'रुने, तू लबाड बोलतेस मला तुझे दफ्तर पाहू दे' म्हणून तो तिच्या पदराला धरण्याची कोशिश करतो. तोच एक चापट त्याच्या गालावर बसली पण याचा विचार न करता रुनावर त्याने अन्याय केला. या पात्राच्या माध्यमातून लेखकाने एक गरीब मुलगी प्रामाणिकपणे पुस्तक परत करतानादेखील तिच्यावर खोटा आरोप करून अन्याय करणाऱ्या माणसांची प्रवृत्ती दाखविली आहे. धनदांडगे लोक गरीब माणसांच्यावर त्यांच्या परिस्थितीचा फायदा घेऊन कसा अन्याय करतात, हे देविदास या पात्रामधून दाखविले आहे.

**'आग' कादंबरीतील पात्रचित्रण :**

**मधू पारखे :**

'बाबुराव गायकवाड' यांनी 'आग' कादंबरीत 'मधू' या पात्राद्वारे सर्व कादंबरी उलगडून सांगितलेली आहे. या कांदबरीतील 'मधू' हे महत्त्वाचे पात्र आहे मधू हा मौजे धावडी गावातील दलित समाजातील जास्त शिकलेला एक होतकरू मुलगा उमापूरला कॉलेजमध्ये असताना त्याच्यावर आंबेडकरी विचाराचा परिणाम होतो. त्यामुळे त्याच्यामध्ये गावातील समाजाकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन निर्माण होतो. त्याला पडलेल्या अनेक प्रश्नातून ही कादंबरी उलगडत जाताना दिसते.

मधू धावडीला येऊन आठवडा झाला होता. बरोबर आणलेली पुस्तकेही वाचून संपली होती. आता काय वाचावे ? याहून पेचात तो होता. आपल्याला थोडीफार शेती असती, तर शेतात काम करण्यात तरी वेळ गेला असता. शेती नसल्याची मोठी खंत वाटते.

आपल्या तीनही वाड्यात कुणाकडेच शेती का नाही बरं ? आपला समाज सगळीकडून कसा दरिद्री राहिला ? आपल्या माणसांनी जमीन जुमल्यासाठी प्रयत्नच केला नाही ? या बाबतीत बारा महिने पूजा-पाठ करून दक्षिणा उकळणारा ब्राह्मण म्हणजे खंडणी वसूल करणारा जुलमी बादशाहच.

कॉलेजला गेल्यापासून त्याने गरीब-श्रीमंत धर्म-अधर्म, भारतीय समाजातील विषमता इ. विषयावर व्याख्याने ऐकली होती. भारतीय समाज व्यवस्थेची उतरंड कुण्या बिनबुडाच्या मनूने लिहिलेली होती आणि स्वत:ला उच्च समजणाऱ्या वर्गाने बळकट करण्यास मदत केली. अशा प्रकारचे विचार अनेकदा त्याच्या कानावरून जात होते.

मधुला डॉ. बाबासाहेबांच्या भल्या मोठ्या डिग्रीचा व त्यांच्या ज्ञानाचा प्रकाश त्याला स्वस्थ बसू देत नव्हता. ध्येयाचा दीपस्तंभ बाबासाहेबांच्या जीवन चरित्राच्या रुपाने जणू त्याला तशी वाटचाल करण्यासाठी खुणावत होता. मोठ्याचा आदर राखणे व नम्रपणे वागणे त्याच्या चांगलेच अंगवळणी पडले होते. आपले म्हणणे ठामपणे, ठाशीव शब्दात सडेतोडपणे कुणाचीही भीडमुर्वतन ठेवता मांडत असे. गावतील लोक हुशारपणाबद्दल मानत. मधू गावी गेल्यांनतर चंदू त्याला जेवण करण्यासाठी घरी घेऊन जातो. जेवत असताना मधुला आपल्या आईची आठवण होते. आईच्या पोरकेपणाची जखम झालेली पहावयास मिळते.

वरील समाजातील कातकरासारखी माणसं पाहून मधू दुखावतो. कारण ही माणसं डॉ. बाबासाहेबांच्या नावावर आपल्या लोकांना लुबाडत आहेत. याची खंत वाटते. आपल्या धावडी गावात संघटना काढण्याचा विचार मनोदय व्यक्त करून आपल्या दलित समाजाची संघटना बांधतो. यावरून तो धडपडून सामाजिक परिवर्तन घडवू पाहणारा दिसतो.

डॉ. बाबासाहेब शिकलेल्या लोकांच्याविषयी म्हणाले होते की, ‘मुझे पडे लिखे लोगोने धोका दिया’ याची खंत बाबासाहेबांनी व्यक्त केली. त्याचे उदाहरण म्हणजे बन्सीसारखा मुलगा शिक्षण घेऊन नोकरी करतो. पण तरीदेखील तो गावकीचीकामे करतो याची खंत व चीड बाबासाहेबांच्या सारखीच मधुलाही येते. यावरून मधू डॉ.आंबेडकरांचे विचार आत्मसात करतो हे दिसते. यावरून तो किती आंबेडकरवादी आहे हे समजून येते.

बाबासाहेबांनी गावकीची कामे करू नका असे सांगितले असतानादेखील बन्सीसारखा मुलगा गावकीची कामे करतो. ही डॉ. आंबेडकरांच्या विचारांची प्रतारणा आहे, असे मधुला वाटून त्याला चीड येते. मधुला स्वत:च्या जातियतेचा अनुभव देखील आलेला आहे. माणिकदाची, जनावर नदीत येतात त्यावेळी मधुला म्हणतो, ‘मी

कोणच्या मधुला फदूला वळखत न्हाय. संभूच्या म्हंजी मांगाच्या संभूचा म्हण की ? मधू काय सांगतुयास मध्या म्हणाला असतात तर वळकलं नसतं का ?' अशी उरात अस्पृश्यतेची जखम करून गेला.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे या नामांतर चळवळीने डोके वर काढले. मधू कॉलेजला असताना मातंग संघटना करतो. अशावेळी त्याला एक प्रश्न पडतो. आम्ही सर्वजण खातो-पितो शिकतो एकाठिकाणी, पण काही श्रेयाच्यावेळी मात्र मांगा-चांभाराची मुले डावलली जातात. मधूने नामांतर चळवळ झालेली स्वत: डोळ्याने पाहिलेली असून झालेल्या हानीमुळे त्याला दु:ख होते.

दलित म्हणणाऱ्या समाजातही त्याला कमालीचा आंतर्विरोध जाणवत होता. तसेच सवर्ण लोकही दलित समाजाला का पुढे जाऊ देत नाहीत अशा तऱ्हेचे अनेक प्रश्न मधू भोवती निर्माण झाले आहेत. यावरून मधू किती चौकस बुद्धीचा आहे हे समजून येते.

'आग' कादंबरीमधून प्रेम जीवनाचे देखील वर्णन आलेले आहे. ते म्हणजे मधू व सरुचे होय. हे दोघेही एकमेकाच्या बरोबर बोलत असतात. पण ते व्यक्त केल्याचे कुठेही आढळत नाही असे मानसिक पातळीवरील प्रेम दाखविले आहे. या दोन्ही व्यक्तिरेखा लेखकाने संयमाने मांडलेल्या आहेत. सरुवर झालेल्या अन्यायामुळे दु:खी झालेला आहे. या दु:खातून त्याचे सरुवर किती प्रेम होते हे दिसते.

या सर्व घटनेमधून मधू किती स्वत: समाज परिवर्तनाच्या चळवळीला झोकून देतो, एकमेकांच्या बरोबर नम्रतेने राहून संयमाने विचार करून एखाद्या कार्याला हात घालण्याची हातोटी दाखविण्याजोगी आहे. आपल्या समाजाची स्वाभिमानी वृत्ती जपण्याचे ठरविलेले आहे असे दिसते. एखाद्यावर अन्याय होत असेल तर त्याला जाब विचारण्याची वृत्ती दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारांचा प्रभाव मधूवर किती होता हे दिसून येते.

**वसंता :**

'आग' या कांदबरीतील वसंत हे पात्र या कादंबरीचा केंद्रबिंदू असले 'मधू'ला सहकार्य करीत असताना दिसतो. वसंता हा मधुचा त्याच्याच जातीतील मित्र आहे. मधू हा जास्त शिकलेला असल्यामुळे त्याला अभिमान वाटत असे. समाज सुधारणेविषयीच्या अनेक कल्पना तो लढवीत असतो. आपल्या समाजातील मुलांना शाळेत शिकण्यासाठी घाला म्हणून घरोघरी जाऊन त्यांच्या बापांना सांगून शिक्षणाचे महत्त्व पटवून देत असे. आज तुम्हाला दहा रुपये लई दिसतात का ? पण ते काई तुमच्या जन्माला पुरणार नाहीत. माझ शिक्षण पूर्ण झालं नाही, मला शिकाव वाटलं नाही, तुमची पोरं शाळेत जायला तयार आहेत ? तर त्यांना का रोखता ? जाऊ द्या, ही पोरं माझ्याएवढी झाली, की तुमच्या हातात दहा रुपये महिन्याच्या बदली शंभर-शंभर रुपये ठेवतील. सरकारही आपल्या जातीला आधी नोकऱ्या देत. असे शिक्षणाविषयी सांगून मुलांना शाळेत पाठविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य धावडी गावात वसंता करतो.

वसंत मधूचा जवळचा मित्र असल्याने गावातील सर्व हकिकती सांगत असतो. वसंता हा वात्रट असल्याने चहाटळपणाच्या गोष्टीही सांगताना दिसतो. वसंतचे शिक्षणही चौथीत अभ्यासात असलेले लक्ष पाचवीच्या वेळी उडाले आणि मधूची सोबत त्याला सोडावी लागली. 'उमापूरला जाऊनपण नव्या कपड्यासारखाच राहिलास म्हण की ? राहिला पण असशील. पहिल्यापासूनच तू असा 'रड्याच' आहेस.

पाटलाने जरुर अन्याय केला होता त्याचा राग मधुच्या मनात धगधगत होता. त्यामुळे मधूने युक्ती लढविली होती. त्यावेळी वसंताने त्याला चांगली साथ दिली. चंपीला पाटलाबरोबर सूत जमविण्याचे नाटक कर म्हणून वसंताने तिला तयार केले व त्यारात्री चंदा पाटलाला बडवून काढण्यास देखील वसंता मागे न राहता पुढे होता.

धावडी ग्रामपंचायतीमध्ये पाण्यासाठी केलेल्या अर्जाला पाटील निराळेच बोलत होता. त्यावेळी वसंत म्हणाला, 'ह्या अर्जाला पाटील तुम्ही कलाटणी देताय वाटतं ? असे पाटलाला बोलण्यास वंसत कमी न पडता बेधडक बोलताना दिसतो.

असा हा वसंता मधूच्या प्रत्येक समाज सुधारण्याच्या कामात मदत करताना दिसतो. यावरून त्याच्यातील सामाजिक बांधिलकी पहावयास मिळते. तसेच मधूच्या विश्वासातील असल्याने महत्त्वाची कामे त्याच्यावर सोपविली असता ती कामे जबाबदारीने पार पाडीत.

**मनोहर उर्फ मन्या चवरे :**

मनोहर हा मधुचा कॉलेजमधील जीवाभावाचा चांगला मित्र. याच्या डोक्यात अनेक कल्पना येत. त्यातीलच एम.आर., एम.जी.,सी.आर. ही त्यातील एक कल्पना. जातीय तेढ निर्माण होऊन भयंकर परिस्थितीची शिकार खेड्यातील दलित समाजातील भोळीभाबडी जनता होती. याची मनोहरला चीड येत होती.

मनोहर हा वात्रट असल्याने कासार सरांना तास सुरु होण्यापूर्वीच शंका विचारायची त्यावेळी सर म्हणतात, 'शंकाच विचार कुशंका विचारू नकोस' त्यावेळी तो म्हणतो 'सर, तुम्हाला एवढे मोठे टक्कल कशाने पडले हो ?' सर त्यालाआवश्यक असणारे उत्तर देतात. त्याच्या पुढे जाऊन मनोहर म्हणतो की, 'सर हा मधू म्हणतो रोज रात्री उंदीर येऊन तुमच्या डोक्यावर चरतो, म्हणून तुम्हाला टक्कल पडलं.'

मनोहर हा चर्मकार समाजातील मुलगा आहे. घरची गरीब परिस्थिती असल्याने पार्ट टाईम काम करण्यासाठी 'करीना' या दुकानात उस्कटलेले सोल वगैरे चिकटवून देईन म्हटल्यानंतर त्याने कामावर ठेऊन घेतले तेही महिना पन्नास रुपये मिळत होते. इतर मुलांच्यासारखा मनोहर हा उधळपट्टी न करणारा मुलगा होता. तो आपल्या पैशाचा वापर

स्वत:च्या खर्चाकरीता व बहिणीच्या शिक्षणासाठी वापरत असतो. बरेच दिवस दोघांची भेट झाली नव्हती. त्यामुळे मधू मनोहरला म्हणतो, ''चर्मकार विद्यार्थ्यांची एखादी संघटना काढलीस की काय ?''[७] का काढू नये ? तुम्ही काढाव्यात अन् तुम्हाला नुस्ती वर्गणीच आम्ही देत बसावे ? आम्ही काही समाजाचं देणं लागत नाही म्हण की ?

''नको रे बाबा आहेत त्या काय दिवे लावतात ते बघतोस ना ?''[८] त्यात आमच्या पणतीची वेगळी भर कशाला ? आमची मुलं सगळीकडे स्वयंस्फूर्तीने कामं करतातच ना ? असे मनोहर बोलून आपण चळवळीत सक्रीय असतो असे येथे त्याला सांगावयाचे आहे. त्यामुळे आपला सवता सुभा कशालाअसे त्याला वाटते. मधूच्या कॉलेजमधील निशा व डावरे हे पुलाजवळ मधुला मारतात. त्यावेळी मनोहर त्याला समजावून सांगतो की, या मुलगीपासून सावध रहा ! म्हणून आपल्या मित्राला समजावून सांगतो.

मधू गावाकडेअसताना पत्र आले. पत्त्यावर अक्षर मनोहरचे होते.तर पत्रातील अक्षर सरुचे होते. अशा तऱ्हेन मनोहर चवरे हा मधुला कॉलेजात असताना त्याच्या सुख दु:खात, चळवळीत बरोबर असतो.

**प्रा. कासार सर :**

उमापूरला मधुला इतिहास हा विषय शिकविणारे मध्यम बांध्याची कासार सरांची मूर्ती मधुला आठवायची. ते शिकवित असताना म्हणायचे की, डॉ. बाबासाहेब कपड्यांचे फार शौकीन होते. भारी भारी सूट ते वापरत म्हणून मी सुद्धा सुटबुटात येतो, असे नाहीबरं का ? आमच्या शिक्षकांच्या पोशाखात तरी नीटनेटकेपणा असावा. शिवाय दहा कपड्यांच्या जोडापेक्षा एक सूट बरा. लवकर फाटत नाही असे म्हणून ते इतिहासात शिरायचे. त्याचे असे कपडे चांगले तसे ज्ञानही चांगले.

व्याख्यानाला सुरुवात करण्यापूर्वी आपल्या अर्धवट टक्कल पडलेल्या डोक्यावर एकदोनदा हात फिरविण्याची सवय सरांना होती. वाक्यागणिक सापाने फुत्कारा टाकावा त्याप्रमाणे बोटाने नाकपुडी दाबीत व 'फूसऽऽ.. फूसऽऽ' असा आवाजही ते काढीत. ते इतक्या सावकाशपणे व लकबदार बोलत की, विद्यार्थी 'रनिंग नोटस्' घेताना संपूर्ण बोलणं उतरून घेत. इतके ते सावकाश शिकवत असत.

त्यांना विद्यार्थ्यांची नावे पाठ नसली, तरी आपल्या कॉलेजचा विद्यार्थी कोणता ? हे पटकन ओळखत. रस्त्यावर कुणा विद्यार्थ्यांची भेट झाली, की त्याला दुसऱ्या दिवशी वर्गात उठवून विचारीत, 'अरे, तू तिकडे काल फेरफटका मारीत होतास का ?' त्या विद्यार्थ्याने 'होय' म्हणावे.

मग ते हळूच म्हणत, 'चांगला फेरा मारत जा पण फटका कुणाला मारत जाऊ नकोस' असा हसत खेळत तास होतअसे. असे हे प्राध्यापक मुलांच्याबरोबर मिळते जुळते घेऊन शिकवत असत. त्यामुळे त्यांच्या विषयाचा चांगला निकाल लागायचा.

एकदा एका विद्यार्थ्याने सरांना विचारले. सर तुम्हाला नोकरीवरून कमी करणार आहेत असे आम्ही ऐकतो. त्यावर ते उत्तरायचे, त्यांची काय हिंमत आहे ? माझी बायको अर्धा हजार रुपये पगार कमावते. मला पूर्ण नाहीतर अर्धी तरी दुसरीकडे नोकरी मिळेलच ! असे ते विनोदी दृष्टीने बोलत असत.

कासारसरांना टक्कल असल्याने डोक्यावर हात फिरवीत असत. हे पाहून मनोहर सरांना तास सुरु होण्यापूर्वीच शंका विचारू काय असे म्हणतो, त्यावेळी सर म्हणतात, 'शिकविण्यापूर्वी कसली शंका विचारतोस रे ? काय विचारायचे ते विचार, पण शंकाच विचार कुशंका विचारू नकोस.' मनोहरने विचारले, 'सर, तुम्हाला एवढे मोठे टक्कल कशाने पडले हो ?'

त्यावेळी सर म्हणतात, 'त्याचं काय आहे, खूप पुस्तके वाचली. आपल्याला एवढी पुस्तके वाचायची सवय कुठे होती ? या पुस्तकातील अफाट ज्ञानाने ओझे डोक्यात शिरताना केसं झडून गेली, समजलं 'असे उत्तर दिल्याने सगळा वर्ग शांत करून सोडत.

मधू आपल्या गावातील सरु या कुमारिकेवर बलात्कार झाला आहे. हे सांगून, त्यावर काही मार्ग सूचवाल म्हणून आलो.

काय म्हणता ? मग त्यात नवं ते काय ? बलात्कार म्हणजे पान खाऊन थुंकावं. इतकं सहज झालं आहे.

कपाळाला आट्या चढवत व भुवया ताणत ते म्हणाले, ''एक उपाय आहे, पण तो तेवढासा सोपा नाही.''[९] 'सांगा तरी, काय अडचणी येतील त्या पुढं बघू.' सावरुन बसत ते बोलू लागले, ''आपल्या माणसांच स्थलांतर केलं तर ?''[१०]

विद्यार्थ्यांनी दुसऱ्या चळवळी करण्यापेक्षा माणसांची मने, वळवून त्यांना विश्वासात घेऊन, खेड्यातून शहराकडे चला अशी त्यांना हाकच द्यायला हवी.

असे हे प्रा. कासारसर समाजात जर परिवर्तन घडवायचे असेल तर दलित लोकांनी खेडे सोडून शहराकडे गेले पाहिजे असे सांगतात. गांधीजीनी लोकांना 'खेड्याकडे चला' म्हणून संदेश दिला तर दलित चळवळीत 'खेड्यातून शहराकडे चला' असा संदेश दिला जातो. राजकारणाचे डावपेच ओळखून सुशिक्षित दलितांना योग्य मार्गदर्शन करणारे कासारसर महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात.

**काकतकर :**

सुरतीमध्ये काकतकरांचेच घर चांगले होते. काकतकरांचे आजोबा ब्रिटिशांच्या काळात मिल्ट्रीत होते. त्यामुळे घर जरा पुढारलेले. काकतकरांना कॉलेजमध्ये घातले पण लाड, कौतुकामुळे ते फारसे शिकू शकले नाहीत. बी.ए.ला एक दोनदा गचका बसल्यामुळे वैतागून त्यांना 'क्रांतीच्या' कचेरीत कारकूनी करावी लागली. मधुला

पहिल्यापासून तो माणूस सरळ वाटत नव्हता. पण त्याच्या समाजातला म्हणून त्याचे मार्गदर्शन तो घेई.

एकदा काकतकरांने मधुला भेटण्याकरीता निरोप दिला होता. मधू आल्यानतर त्याला म्हणतो, ''डॉ. बाबासाहेबांनी तुझ्या समाजाला त्यांच्या कार्यात येण्यासाठी टाहो फोडून बोलावले, पण तो शेवटपर्यंत गेला नाही. त्यांना बाबासाहेब कळले नव्हते.''[११]

आपल्या गावची अमूक सुधारणा करतो, तमूक करतो, असे म्हणून आपल्याच समाजातील गरीब माणसांना तो लुबाडीत होता. त्याने पंचेचाळीस वर्षाच्या आयुष्यात पन्नास तरी उद्योग केले असतील. निळी टोपी डोक्यावर चढवून टोप्या घालणे व बदलण्याचे उद्योग रोजचेच असतं.

कुणाच्याही मुला-मुलींची लग्ने लावून देतो, नोकरी लावून देतो म्हणून त्याने कित्येकांचे पैसे खिशात घातले होते. विहिरी खोदण्यास तसेच बी-बीयाणास पैसे मिळवून देतो म्हणून शेतकऱ्यांच्याही हातावर त्याने 'धतुरा' ठेवला होता.

समाजकार्य करण्याच्या नावाने समाजाला पद्धतशीरपणे लुबाडण्याचे कार्य करीत होता. त्यातच त्याला शे.का.चे वसतिगृह चालविण्याची संधी मिळाली. व्यवस्थापकाला खोटे हिशोब ठेवायला सांगून घरला पैसे ओढण्याचा त्याने सपाटा चालविला. मुलांनी स्वयंपाकाबद्दल तक्रार केली, तर सरकारच कमी पैसे देते म्हणून त्याला गप्प बसवू लागला. 'तुमचे हिशोब दाखवा' असे एखाद्या मुलाने विचारण्याचे धाडस केले, तर त्या मुलाला तो मुख्याध्यापकाला सांगून नापास करायचा.

मुलांच्या मिटिंगमध्ये मात्र डॉ. बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यापुढे ठेऊन विद्यार्थ्यांनी अखंड ज्ञानसाधना चालू ठेवावी. अमेरिकेत शिकत असताना डॉ. बाबासाहेब दोन पातळ पापडावर दिवसभर रहात, तुम्हाला इथे उपाशी तरी राहावे लागत नाही ना ?

दोन वेळचं पोटभर जेवण मिळतं ना ? असं सांगून विद्यार्थ्यांची तोंड बंद करत. त्यामुळे जे काही असेल तेच विद्यार्थी खाऊन दिवस काढतं.

जातियतेची उतरंड रचून उच्चवर्णियांना हजारो वर्षे जगण्याची सोय मनूने करून ठेवली होती. डॉ.बाबासाहेबांनी खडतर परिश्रमाने दलित समाजाला इतर समाजाच्या बरोबर आणले. जीवनभर संघर्ष करून रक्ताचे पाणी केले व 'नवा माणूस' निर्माण केला. दलित समाजाला अन्यायाविरूद्ध झगडण्याची जिद्द आणि प्रभावी शक्ती दिली. बाबासाहेबांच्या शिकवणीने सुशिक्षित दलित माणूस ताठ मानेने समोरील माणसांच्या डोळ्यात बघून, बोलू लागले.

सवर्णांना तर 'मुँहमे राम और बगलमें छुरी' परंपरेने बहालच केली होती. पण 'जयभीम बोलो, कुछभी करलो !' अशी वृत्ती दलित पुढाऱ्यांची झाली होती. राजकारणात दलितांचे अनेक पुढारी वरपर्यंत जाऊन बसले आहेत. ते ज्ञानानेही आणि मानानेही मोठे आहेत. पण त्यांच्यात सत्तेसाठी लठ्ठालठ्ठी चालली आहे. या भांडणात तिसऱ्याचा फायदा या न्यायाने इतर समाज फायदा उठवीत आहे. असे वर्णन करून बाबुराव गायकवाड यांनी दलित समाजातील राजकारणावर प्रकाश टाकला आहे. काकतकरासारखे कित्येक भंकस पुढारी 'ताकावर वैजा खुशाल' या वृत्तीने वागत होते. सर्व समाज दलितांना धूर्तपणे एकत्रित व संघटित होऊ देत नव्हता. त्याची ही चीड पुढारी म्हणविणाऱ्यांना येत नव्हती. याची मोठी खंत मधुला वाटते.

दलित समाजातील सरुला देखील या काकतकराने नोकरी लावतो व तेथील मुलाला दाखवून लग्नही लावून देतो म्हणून तिला घेऊन जातो. त्यामुळे तिच्या आयुष्यावर पाणी फिरवतो. अशा या पुढाऱ्यांचा मधुला राग येतो.

बाबुराव गायकवाड यांनी 'आग' कादंबरीत काकतकरासारखे पात्र आणून दलितांच्यातील माणसे कशी विकृत प्रवृत्तीची बनली आहेत याचे एक उदाहरण दिले

असून अशा व्यक्तींनी पुढारी होऊ नये असे थोडक्यात सांगितले आहे. तर त्या पुढाऱ्यांनी आपली प्रवृत्ती चांगली ठेवावी व डॉ. बाबासाहेब यांचे विचार आचरणात आणून मानवतावादी वृत्ती वृद्धींगत करावी असे सांगितले आहे असे दिसून येते.

**संभू :**

संभू हा मधुचा वडील. घरची अत्यंत गरिबी असल्याने दुसऱ्याची जनावरे राखण्याचे काम करीत असतो. मधूसाठी संभूने रंडकपण काढले. मुलाचे हाल होतील म्हणून दुसरे लग्न ही केले नाही. मुलांच्या चौथीच्या अभ्यासाच्यावेळी रबर जाळून उजेडाची सोय करून मुलाची काळजी घेणारा खरंच पुत्रदक्ष म्हणायला हवे असे वाटते. घरची गरिबी असल्याने खोपटात राहणारा.

आपल्या मुलाला गहिवरून म्हणतो, 'शिकशणासाठी असा किती दिसं लांब राहणार आहेस. आता कसलीबी नवकरी बघून आसरा करायचं बग. मी अजून कुठवर लोकांच्या दावणीला पडू ?' असे संभू काळजापासून बोलताना दिसतो. पण असा गहिवरून बोलणारा संभू कधी गावातील लोक काही बोलले तर त्यांचे ऐकून मधुला शहाणपण शिकवितो. त्याचा मधुला राग येत असे.

गावात दिलेल्या अर्जावर संभूने सही केली असताना देखील मी केली नाही म्हणून धडधडीत खोटं बोलायला कमी करीत नाही. यावरून त्याच्या भेकड वृत्तीचे दर्शन होते. तसेच त्याच्यातील परंपरावादी वृत्ती देखील दिसून येते. या सर्व घटनेला संभूचा अशिक्षितपणा कारणीभूत आहे असे वाटते.

**बन्सी :**

बन्सी हा लुळाण्णाचा मुलगा. एस.एस.सी. होऊन एका शाळेत मास्तरची नोकरी करीत असतो. धावडी गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती का साजरी करीत

नाही म्हणून बन्सी गावातील सरपंच व पाटील याला जाब देखील विचारताना आढळतो. पण हाच बन्सी डॉ. बाबासाहेब यांनी आपल्या समाजात जर स्वाभिमानी वृत्ती जागृत करायची असेल तर प्रथमथ: गावकीची कामे नाकारली पाहिजेत असे म्हटले असताना देखील हा गावकीची कामे करताना कादंबरीत पहावयास मिळतो. या पात्राच्या माध्यमातून गायकवाड यांनी दलित समाजातील मुले शिकून देखील गावकीचे काम नाकारत नाहीत हेच दाखविलेले आहे. असे करणे म्हणजे एका अर्थाने बाबासाहेबांच्या विचारांना धोकाच दिल्यासारखे आहे असे वाटते.

**सित्याबापू :**

होलेरवाड्यात जन्माला येऊन भिल्लाचं काळीज असलेला सित्याबापू अंगाने धिप्पाड व दणकट होता. त्याचा स्वभाव जितका सरळ तितकाच उर्मट व रागीटही होता.

माली पाटील रोज सकाळी त्याला बोलावून विचारायचा, 'कालतरी तुझा मुक्काम कुठे होता ?' तुझे मित्र कुठे होते ? सित्याबापू एके दिवशी त्याच्या विचारण्याला कंटाळून जोडीदारांना घेऊन माली पाटलाचीच चोरी केली. त्याच रात्री माली पाटील जाब विचारायला ओरडतचं गेला. त्याबरोबर सित्याच जोराने ओरडला. धावा रं, मेलो..रं चोरऽऽ चोर.... असे ओरडून माली पाटलालाच चोर ठरवितो. असा हा सित्याबापू कलागती होता.

माली पाटलाच्या रानात अनेक वर्षे राबत होता. पोरीच्या लग्नापायी उचल झाली. त्यातच दहा वरसापासून रक्ताचं पाणी करून राबणारा पहावयास मिळतो. यावरून गरीब माणसांना राबवून घेणारी सवर्ण व्यक्ती ही दिसतात.

स्वाभिमानी असणारा सित्याबापू आपल्या समाजातील मुलांना मारण्यासाठी येतात. त्यावेळी म्हणतो, 'ह्यांच्या व्हटाचं दूध अजून वाळलं न्हाय.' तर गवसीचे

आमच्या पोरांना काटक्या घेऊन धावतात. आता वाचून गेलात पर यापुढं एकेकाचे मुडदेच पडतील.' वाड्याजवळ जात म्हणाला, 'पोरांनो, इथून फुडं असं गाफील राहू नगा. लाट्या-काठ्या घेऊनशानच दरवाज्यासमोर बसा. येईल त्याचा मुडदा पाडा. कुणाची हयगय करू नका.' असा सित्याबापू अन्यायाच्यावेळी आक्राळविक्राळ रुप घेणारा तर कधी नम्र होताना दिसतो.

**लुळाण्णा व नेमाजी :**

लुळाण्णा व नेमाजी या दोन व्यक्ती गस्त घालतात. यावरून लेखकाने लाखो वर्षापासून आपला समाज दुसऱ्याला 'हुश्यार राहायाला' सांगून त्यांच्या प्राणांची व मालमत्तेची राखण करीत आलाय. आतापर्यंतही आपल्या समाजाला त्यांच्या गुलामीची जाणीव का झाली नाही, असे अनेक प्रश्न त्याच्यातून लेखकाने दाखविले आहेत.

**प्रा. दौंडसर :**

उमापूरमधील कॉलेजात मधू शिकत असताना दौंडसर हे प्राध्यापक म्हणून होते. सरांचा व मधूचा एन.एस.एस. मुळे संबंध येत असतो. एक दिवस मधू सरांच्या घरी जातो, त्यावेळी सरांच्या घरी पाहिल्यानंतर मधुला निराळेच वाटायला लागते.

दौंडसर सवर्ण असले तरी त्यांच्या वागण्यात सवर्णाचा ताठा कधीही मधुला दिसला नाही. ते म्हणायचे की, तो सोवळा आणि ओवळ्यातच असला पाहिजे. अशा मनाचे ते नव्हते. आपल्या घरी ज्याने त्याने खासगी जीवनात ब्राह्मणपणाचे पालन केले, तर त्याला कोणाची हरकत नाही असे ते म्हणत. मधुला आपल्या मुलीची ओळख करून देतात. सर्व घर दाखवितात.पण मधुला कोठे त्यांच्या घरात श्रीकृष्ण, राम, बुद्ध, येशू, महादेव यांच्या फोटोबरोबरच गांधी, नेहरू, फुले, आगरकर, आंबेडकर यांच्या फोटोनी घर सजले होते. त्यांच्या घरता देव्हाऱ्याचा त्याला कुठेच मागमूस दिसला नाही. वरील

सर्व फोटांना हार अगर अगरबत्ती लावलेली दिसत नव्हती. हे सर्व फोटो पाहून त्याच्यातील असणारी 'माणुसकी व मानवता' हाच माझा देव धर्म आहे. या सर्वांची जीवनचरित्रे वाचून मला खरा माणूस म्हणून जगण्याची एकनवीन दृष्टी प्राप्त झाली असे सर म्हणतात.

'मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासहेब आंबेडकर' नाव दिले पाहिजे म्हणून मोर्चा जिल्हाधिकारी कचेरीकडे जातो. हे सर्व मधू व दौंडसर पहात असताना यांच्या याविषयी चर्चा होते. त्यातील दौंडसरांचे मत होते की, दोन्ही लोकांच सामंजस्य घडवून आणणं हाच एक तोडगा आहे. लोक लिहिण्या-वाचण्यास शिकले, पण अजूनही स्वतंत्रपणे विचार करायला शिकले नाहीत. मेंढरासारखे नेत्यांच्या पाठीमागे डोळे झाकून ते धावतात असे म्हणून दौंडसर वाचकाची दृष्टी राजकारणाकडे वळविताना दिसतात.

''डिग्रीवर एका महाराचे नाव येते, तेही एका जगवंदनीय अशा प्रकांड विद्वानाचे नाव, तुम्ही डिग्रीवर त्याचे नाव येते, म्हणून विद्यापीठाला नाव देण्याचे नाकारला तर माणसांना कसे काय आपलेसे करणार ? त्यांना आपली घरेदारे कशी खुली करणार ? कोणतं शतक हे ? यांच्यातला हा अमानवीपणा केव्हा नष्ट होणार ?''[१२] हे सर्व बोलत असताना दौंडसरांना धाप लागली. त्यांच्या शब्दाशब्दात चीड, संताप, व्यक्त होताना दिसतो.

सवर्ण समाज हा सुखासुखी दलितांना त्यांचे हक्क आणि अधिकार द्यायला अजूनही तयार नाही. त्यासाठी संघर्ष हा करावा लागणार असेही ते म्हणतात. त्याचबरोबर दलितांच्या विषयीही खंत व्यक्त करताना म्हणतात की, आधीच पोटासाठी जगता जगता मरणारी माणसे यांचे मागे काहीही निशाणी उरत नाही. जे नेतृत्त्व करतात त्यांचा या दंगलीत केस तरी वाकडा होतो का ? याकडे त्यांनी दलितांचे लक्ष वेधले आहे.

लोकांची मतं परावर्तीत करण्यापेक्षा मनं परावृत्त केली पाहिजेत. असे मानवतेच्या दृष्टीने म्हणतात.

दलित लोक संघर्ष देतेवेळी दलितांची हानी होऊ नये यासाठी, दौंडसरांनी बाबासाहेब आंबेडकरांचा संदर्भ दिला आहे. बाबासाहेबांनी न्यायासाठी हक्कासाठी वेळोवेळी लढे दिले. अपूर्व असा संघर्ष उभा केला, पण अशी प्राणहानी झाली का ? असे प्रश्नार्थक बोलताना दिसतात.

अशा या पात्राच्या माध्यमातून बाबुराव गायकवाड यांनी सवर्ण लोकांच्यात देखील दलितांविषयी तळमळ दिसते यावरून समानतेचे तत्त्व त्यांच्यात आहे. मत परिवर्तनापेक्षा मने परिवर्तीत होणे गरजेचे आहे असे वर्णन त्यांच्या कादंबरीत आले आहे.

**सरु :**

सरु ही या कादंबरीतील स्त्री पात्र म्हणून महत्त्वाचे आहे. सरु सारख्या सुंदर मुली आपल्याही समाजात असतात यावर मधूचा विश्वास बसेना. मधू धावडीला आल्यावर सरु म्हणते की, 'तू शिकतोस तिथे मुलींचे पण बोर्डिंग असेल की ?' मग मला घेऊन चल की ? घेऊन जाईन असे तिला सांगतो. रात्रीच्या अंधाराला दिवा लावून घालवता येईल. पण या सनातन अंधाराला कुठला दिवा आणावा ? अशी तत्त्वज्ञानाची भाषा बोलताना सरु दिसते. अशा या सरुवर पाटलांनी बलात्कार केला आणि तो तिच्याच समाजातील म्हातारीने तिला बळी दिला होता. ही सर्व हकिकत सरुने पत्राने कळविली होती. यावर उपाय काय करायचा म्हणून मधू कासारसरांचे मार्गदर्शन घेऊन याचा बदला घेण्यासाठी धावडीला येतो. पण तिथे सरु नसते. त्यामुळे तो दुखावला जातो.

सरु कुठे गेली म्हणून मधू सरुच्या आईला विचारतो,

"मावशी तू का रडतेस ? सरु कुठं दिसतं नाही."

"आज पंधरादी झालं, ती आपल्या मामाकडे गेलीयं."

"कुणाकडे ? त्या कातकराकडं."

"मावशे, सरुला, कातकराकडे पाठवून काही बरं केलं नाहीस बघं." म्हणून दु:खी होऊन घराकडे जातो. काही दिवसाने मधुला पत्त्यावरील अक्षरे मनोहरची पण आतील अक्षरे सरुची असलेली दिसतात. त्यामध्ये कातकरासारख्या व्यक्तीने नोकरीचे व लग्न लावून देतो याचे अमिष दाखवून तिला घेऊन जातो. व एका स्त्रीच्या स्वाधीन करतो. ती बाई म्हणते कातकर माझा कोणी नाही, तू गुपचूप धंदा कर, नाहीतर दोन महिने पोसल्याचा खर्च असे म्हणून एका माणसाच्या स्वाधीन करते. अशा पद्धतीने सरुच्या आयुष्याची बरबादी झालेली पहावयास मिळते. ही सर्व हकिकत सरु पत्राद्वारे मधुला सांगते.

सरु व मधू हे एकमेकांवर प्रेम करीत असतात. पण त्यांनी ते व्यक्त केले नाही. तर लेखकाने त्यांचे प्रेमाचे वर्णन केलेले दिसते. सरु व मधूच्या चित्रणात बटबटीतपणा येण्याची शक्यता होती. परंतु या दोन्ही व्यक्तिरेखा संयमाने रेखाटण्यामध्ये बाबुराव गायकवाड यशस्वी झाले आहेत. त्यामुळे सरु हे पात्र मनाला चटका लावून जातं. अशाप्रकारे सरु हे पात्र रंगवून कादंबरीत लेखकाने वाचकांच्या मनास धक्का दिला आहे.

**चंदूची आई :**

चंदूची आई काळीसावळी पण मजबूत बांध्याची. खंबीरपणे पुरुषासारखा संसार करणारी मधुला चंदूच्या आईला बघितली की आपल्या आईची आठवण होते. मधूवर आपल्या मुलासारखीच माया करीत असते.

चंदूच्या घरी मधू यायला लागतो त्यावेळी ती म्हणते की, 'हात दोडा, काय म्हणावं तुला ? माळव दं वाटायला ती काय भाजी-भाकरी हाय का काई खायची वस्तू रं ? उद्यापासून रोजरोज येत चलं. तुला कुणी काई म्हणायचं नाही. चंदू व मधू अभ्यास करीत असताना चंदूच्या मनात आल्याने म्हणतो की, 'आज हे गणित सोडवू', माळवदाच्या एका कोपऱ्यात दाबळग्याखालची कात्री काढून हजामत करतो. अशावेळी

आई येते पण हे सर्व पाहू नये याकरीता मधूने डोक्याला धोतर गुंडळले. पण ऐनवेळी डोक्याचे धोतर सुटले. ते पाहून चंदूची आई म्हणाली, 'हे रं काय ? हा माळवदावर आला तवा यांच्या डोक्यावर लांब लांब केसं होती की ? आता कुठे गेली रं ? अन् तुझ्याकडं भोरग्याखाली काय झाकून ठेवलंय ?' चंदूच्या आईची किती बारकाईने नजर असते, हे दिसते. पण हे झाले असताना देखील कुणाला न सांगता मनात ठेवते. यावरून चंदूच्या आईचा माणसाकडे बघण्याची समानतेची दृष्टी दिसते.

आपल्या मुलासारखीच 'का रं मधू, तू ढोकळा खातूस का ?' असे मायेने विचारत असते. चंदूची आई चंदवाडीच्या भानूचा संदर्भ देऊन म्हणते की, धाटाचा बाजार असला की, तुमच्या माणसांच्या बी हजामती करतो. आता कुठं काय राहलंय म्हणा ? पर या खेडयातल्या लोकांच्या टकुऱ्यातलं जात न्हाय. तवर आपण आपली पायरी सांभाळायचीच दुसरं हाय काय ?' यामधून चंदूच्या आईचा जातियतेच्या बाहेर पाहण्याची विधायक विचार पहावयास मिळतो.

तसेच ती मधुला मारण्यासाठी पाटील कट रचतो पण चंदू वारकेच्या घरी समजल्यानंतर चंदूचे आई-बाप व चंदू विचारक्रांत होऊन मधुला वाचविण्यासाठी चंदूची आई एक तत्त्ववेत्त्यासारखी बोलून त्याला घरी दडवून ठेवते. यावरून चंदूची आइ किती प्रेमळ, मायाळू, जातियतेच्या पलिकडे पाहणारी अशी होती, हे लेखकाने दाखविले आहे.

**चंदा पाटलाची बायको :**

चंदा पाटील हा रात्री कुठेतरी बाहेरगावी गेला असेल म्हणून ती नाराजीचा कटाक्ष टाकून रोजच्या कामात लागते. चंदाला होणारी कळ त्या गप बसवेना त्यावेळी तो बायकोला बोलावितो, अग, जरा हळद अन् गोडेतेल घेऊन ये बर.

'त्येचं काय करतावं ? पिवळं होऊन हौस फिटली नाही. दुसरं लगीन करण्याचा इरादा हाय का ? दुसरी बाईल करावी, म्हंजी तरी तुमच मन भरल. आणीक जीवबी जायचा न्हाय' अशी आपल्या नवऱ्याला बोलण्यातून चपराक मारते.

आपला नवरा कुठून तरी मार खाऊन आलाय हे ओळखून तिला आसूही आवरले नाही. नकळत तिच्या डोळ्यातील कढत आसवे त्याच्या पाठीवर पडू लागली. या स्त्रीतून आपल्या भारतातील स्त्रिया किती मोठ्या मनाच्या आहेत हे दिसून येते. पण तिने आपला नवरा मरणाच्या दारातून वाचून आला, म्हणून तिच्या मनाला समाधान वाटून तिने मंगळसूत्र चाचपून देवाचे आभार मानले. यावरून ती नवऱ्याची काळजी करताना दिसते. यामधून भातरतीय स्त्रीची प्रतिमा दिसून येते.

**सरुची आई :**

सरुच्या पतीचा साप चावून मृत्यू झालेला असतो. तेव्हा पासून ती एकटीच दिवस काढते. सरुकरीता कष्ट करून प्रत्येक दिवस घालवत असते. मधू आला असे समजल्यानंतर ती रानातून येऊन त्याची मायेने विचारपूस करून जेवण देऊन ती परत आपल्या कामावर जाते. सरुची आई ही साधी भोळी असल्योनच ती काकतकरांवर विश्वास ठेवून आपल्या मुलीचे भले होऊन स्वत:च्या पायावर उभी राहू दे अशी इच्छा असते. म्हणूनच तिने आपल्या सरुला पाठविलेले दिसते. यावरून स्त्रीने देखील आपल्या वाट्याला आलेले दु:खाचे दिवस मुलीवर येऊ नयेत म्हणून दूरदृष्टीने विचार करणारी स्त्री दिसून येते.

काही दिवसांनी काकतकर येतो त्यावेळी ती सरुची मनापासून चौकशी करताना दिसते. यावरून सरुच्या आईचा जिव्हाळा, प्रेम, साधी-भोळी असूनही मुलीच्या भावी जीवनाचा विचार करते.

**निशा :**

निशा ही मधूच्या वर्गातील असून कॉलेजच्या प्रत्येक कार्यक्रमात भाग घेणारी व स्वत:ला कार्यकर्ती समजून सर्वत्र संचार करणारी मुलगी म्हणून ती नेहमी कुर्याने वागे. मधुला चिडविण्याच्या उद्देशाने ती मुलांना म्हणाली, "तो बघा, आधुनिक बुद्ध कसा ध्यान लावून बसलाय."[१३] काळी मैना खरोखरच भारी आहे असे मधूने तिच्याविषयी म्हटले.

डावरे ह्याने या निशाचा अधार घेऊन मधुला मारले आहे. त्यामुळे मधुला तिचा राग येत असतो. अशी ही निशा हर हुन्नरी पहावयास मिळते. अशा प्रकारे या कादंबरीमध्ये चंपा, चंद्री सारख्या स्त्रीया ही आलेल्या दिसतात.

**चंदा पाटील :**

चंदा पाटील हा हेकेखोर वृत्तीचा दाखवलेला आहे. त्याने सरुसारख्या मुलींवर अन्याय केलेला दिसतो. अशा व्यक्तिविषयी राग आल्याशिवाय राहत नाही. या पात्राच्या माध्यमातून दलित स्त्रियाकडे वाईट दृष्टीने पाहतो याचे चित्रण आलेले आहे.

**चंदू वारके :**

चंदू हा मधूचा सवर्णातील शाळेतील मित्र असून ते दोघे एकत्र अभ्यासकरीत असतात. अशाच एका वेळी चंदूने घरीच मधूचे केस कापले असता आईला हे ओळखल्याने ती त्याला असे करू नये म्हणून वागते. त्यावेळी चंदू स्वत: माफ कर म्हणून आईला विनवणी करताना दिसतो.

मधू गावी आल्यानंतर त्याला चंदू जेवण करण्यासाठी घरी घेऊन जात असतो. काही ठिकाणी चंदूच्या तोंडून साहित्यिक शैलीसारखे बोलणेही येत असते. तसेच आपल्या कल्पना करण्याची कुवत नाही म्हणून तर ऑफिसात खर्डेघाशी करीत बसलो अशी खंत व्यक्त करतो.

पाटलाने मधुला मारण्याचा कट रचला असताना त्याला पाठविण्यासाठी चंदूने त्यांच्या समाजातून आपल्या घरी लपवून ठेऊन त्याची काळजी घेतलेला दिसतो. ते अनेकवेळा चंदूने मधुला आधार दिलेला आहे. असा हा चंदू मधूचा चांगला विश्वासातील मित्र होता.

बाबुराव गायकवाड यांनी चंदूच्या माध्यमातून सवर्णातील काही व्यक्ती दलितांच्याविषयी चांगल्या असतात हे दाखवून दिलेले आहे.

**सत्तारचाचा :**

सत्तारचाचा हा पोस्टमन आहे. याचे चित्रण कादंबरीत अधून मधून पहावयास मिळते. बन्सीने आपले जेवण बाटविले म्हणून त्याला सवर्ण मुलं मारत असताना त्या ठिकाणी सत्तारचाचा येऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून देतो. मधुला पत्र देत असताना गावातील बातम्याही सांगतो, असे त्याचे वर्णन येते.

**सरपंच व पाटील :**

ही गावाची दोन मुख्यपदे असताना देखील आपल्या अधिकाराच्या जोरावर दलितांवर दबाव आणल्याचे दिसते. मधुला मारण्याचा कट देखील पाटील रचतात. सरपंचाकडील दलितांचा अर्ज ठेक्यात वाचतात व त्याचा बेअर्थ आमच्याशी सोयरीक करता म्हणा की असा करण्याचा प्रयत्न करतो. तसेच पाटलांने दलितांना 'वेशीच्या आत पाऊल ठेवू देवू नका, दुकानदारानी यांना सामान देऊ नये व जर असे कोणी पाळले नाही तर ठोकून काढा.' पण पोलीस आल्यानंतर सरपंच व पाटील यांची घाबरगुंडी उडाल्याचे दिसते. अशी ही गावातील मुर्ख व्यक्ती असताना देखील आपल्या अधिकाराचा गैर वापर करताना दिसतात.

**भाषाशैली :**

'भाषाशैली' हा कथा, कादंबऱ्यामधील महत्त्वाचा घटक असून भाषेमुळे कादंबरीचे वेगळेपण निदर्शनास येत असते. त्याचप्रमाणे 'झळ' या कादंबरीत लेखकाने भाषाशैलीचा वापर पात्रानुरुप केला आहे. प्रत्येक पात्र हे आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेमुळे उठून दिसते. त्यामुळे त्यांचा स्वभाव, प्रदेश, भाषेचे वेगळेपण जाणवून येण्यास मदत होते.

'झळ' या कादंबरीतील भाषा सरळ, साधी, सोपी असली तरी एक प्रकारे मनाला चटका लावण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये आहे. काही उदाहरणावरून ती आपणास बोलकी वाटतात.

'झळ' या कादंबरीचा नायक शेशू याची बहिण सोमी एक दिवस आईला बिलगून विचारते. ''कोण्या जन्मीचा शाप म्हणून आपण भिकारी झालोत ग माय ?''[१४] सोमीच्या या वाक्याने आतडी पिळवटून टाकणाऱ्या प्रश्नाने माणुसकी जागृत असणारे सर्व वाचक अस्वस्थ होतात. एक तरी सोमीच्या प्रश्नाला उत्तर नसते किंवा असले तरी सांगण्यासारखे नसते.

या कादंबरीमधील आणखी एक प्रसंग सांगता येईल. ''आम्ही कोणतेही काम करून फेडू पण आम्हाला खायला द्या.''[१५] म्हणून गरीब धरणें धरू लागले.... कोणी काही देईना. तेव्हा हैराण होऊन गावातील महारमांगांची तरुण माणसे एकत्र आली. आपण असंही उपाशी मरतोय, मग तस तरी मरू. साधल तर साधलचं गावामध्ये एकदोघांच्या घरी घुसून जे काही आहे ते काढू.

'भूक' काय करू शकते, याचे विदारक सत्य लेखकांनी सांगितले आहे. दलितांना दलित ठेऊन उर्वरित समाज सुरक्षित जीवन जगू शकेल, असे ज्यांना वाटत असेल, त्यांचा हा भ्रम आहे. असा इशारा या प्रसंगाद्वारे दिला आहे.

मुलांची मने स्वच्छ असतात, निरागस असतात त्यांची मने गढूळ करतात ती मोठी माणसे एवढ्याश्या एका छोट्या प्रसंगात लेखकांने उपरोधिकपणाने सांगितले आहे.

''रांडीच्या खालच्या पायरीच्या पोरीबरोबर असं खेळतुयास''[१६] असे शेशूचे बाबा शेशूला विचारतात. तेव्हा छोटा शेशू मनात म्हणतो, 'पायऱ्या तर कुठचं दिसत नव्हत्या. मग वरची पायरी व खाचली पायरी, असे काय म्हणत होते ?' अशा या भाषाशैलीमुळेच 'झळ' कादंबरी यशस्वी झाली आहे. 'झळ' कादंबरीची भाषाशैली मिश्र स्वरुपाची आहे. या कादंबरीमध्ये वाक्प्रचार, म्हणी, प्रतिमा, प्रतीकांचा वापर केलेला आहे. यामध्ये ग्रामीण बोलीचा आणि इंग्रजीचा वापर केला आहे. भाषाशैलीमुळे पात्रे जिवंत आणि उठावदार दिसतात. प्रसंगानुरुप, वातावरणानुसार भाषेचा उपयोग करण्याची कला लेखकाच्या अंगी आहे हे दिसते. म्हणूनच भाषाशैली हा कादंबरीचा गाभा मानतात.

भाषाशैलीमुळे 'आग' ही कादंबरी तिच्या मराठवाड्यातील ग्रामीण बोलीने वाचकाच्या मनाचा वेध घेते. या कादंबरीमध्ये मराठवाड्यातील भाषेचा झालेला प्रभाव दिसून येतो. या कादंबरीची भाषा अस्सल देशी मातीतील असून तिचे मराठीपण बाबुराव गायकवाड यांनी जिवाभावाने जपलेले आहे. शहरी जीवनाच्या वर्णनापेक्षा ग्रामीण जीवनाचे वर्णन अधिक ग्रामीण शब्दाची जाणीव करून देतात.

मधू उमापूरातून धावडीला येतो त्यावेळी वसंत मधूच्या घरी येतो. त्यावेळी त्यांचे बोलणे सुरु असतानाचा प्रसंग ध्यानात घेण्यासारखा आहे.

''कोण रं ?''

''मी वश्या. अंधारातच काय बसून राहिलास ? लिंबाच्या पारावर तरी चल. बोलत बसू.''

''होय'' म्हणून मधू बाजेवर उठून बसला.

"व्हय काय ? बाळातीणबाईसारखं कोंडून घ्यायची तुझी सवय काही गेली नाही अजून."

"बाहेरुनच काय बोलतोस ? आत ये ना."

"म्हणजे आताही तू बाहेर येत नाहीत म्हण की ?" वसंत बाजेवर बसत म्हणाला. "घरात रॉकेल नाही जणू ? नाहीतर संभूतात्या घरी कुठं राहतो ! तो भला आणि त्याची नोकरी भली. आमच्या घरुन आणू का ? की येतोस लिंबाच्या पारावर ?"

"नको, बस घटकाभर इथचं बोलत बसू ! सकाळपासून कुणी भेटल नाही. बरं झालं, तू आला ते !"[१७]

मधू समाजातील लोकांना संघटनेचा विचार पटवून देत असते वेळची भाषा –

"हे सर्व का होतयं, ते सांगू ?"

"सांग की, आम्ही ऐकायला तर जमलोत" भिवा बोलला.

"आपल्या गावात एकी नाही म्हणून."

"हंगंड असं हाय म्हणतुयास रं ? तुला लई पटलं जणू ? मंग मांगा-महारांची खेटरं सांधून देतुस का ?" भिवा.

"मगापासून लई बोल्लास रं. आमची जनावरं मेली तर कंदी वढून टाकलीस का ?"

"आमच्या बापजाद्यांनी तुमची जनावरं वेढली का ? बोल ? टाकली असतील तर म्या आता वढून टाकतो." भिवाचे आणि रंगा म्हाताऱ्याचे भांडण वाढत चालल्याचे बघून किशा म्हणाला, "मांगांचीच जनावरं म्हारं वढीत नाहीत तर चांभाराची कशी वढतील ?" "तू कंदी आमच्या घराला का गोठ्याला तोरण बांधलसं रं ?" त्याच्याकडे डोळे गरागरा फिरवित भिवा बोलला.

''तुम्ही सगळेजण थोडावेळ गप्प राहा बरं. आपलं सगळ्यांचच चुकलयं, आपणच एकमेकांची कामं केली नाहीत. घरात अंधार ठेऊन व उपाशी राहून कुठबटाची कामं पावसापाण्यात मरेपर्यंत केली. ती ही फुकट.आता तरी हे सर्व सोडून द्या. काहीतरी स्वतंत्र उद्योग करून आपलं घर चालवा.''[१८]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला गावकीची कामे करू नका असे म्हटले असताना देखील बन्सी शिकूनही गावकीची कामे करीत असताना मधू पुढील प्रसंगातून चीड व्यक्त करतो. त्यावेळची भाषा -

न्याहारीची वेळ झाली, तरीही लुळाण्णा व नेमाजी गावातून आलेले त्याला दिसले नाहीत. तो लिंबाच्या ओट्याजवळ आला, तेव्हा येशीकडून बन्सी जनावर ओढीत येत असलेला दिसल्याने मधूच्या मस्तकाची शीर तट्ट फुगली.

''सकाळी सकाळीच कुणाचं मेलं रं ?''

खांदा पालटीत बन्सी म्हणाला, 'दादारावचं. रातीच दावनीला मरून पडलं व्हतं.' हत्तीसारखी मोठी म्हैस ओढताना त्याच्या तोंडाला फेस आला होता. तिच्या ओझ्यामुळे खांद्यावरच्या दांडयाचा भार पेलवत नव्हता. दोन बैलांनी किर्लोस्कर नांगर नेटाने ओढावा, तसे ते म्हैस ओढत होते.

त्याची बिथरलेली अवस्था बघून मधू म्हणाला, ''तुझा शिकूनही हाच उद्योग चालला आहे का ?''

''सर्वांनीच हे करू नये, असे किती दिवसापासून सांगतोय, हे करायचं तर डॉ. बाबासाहेबांचे नाव आपण काय म्हणून घ्यायचं ? पुढच्याच महिन्यात जयंती करायची आहे, तरी अजून हीच कामं करायची का ?''

''चल रं बाबा, त्यो काय रिकामा हाय. दांडीनं खांद्याचं सालट निघतया.''[१९] भिवा त्रासून म्हणाला.

**संघर्ष :**

कोणत्याही कादंबरीमध्ये 'संघर्ष' हा महत्त्वाचा घटक मानला जातो. संघर्षाच्या चढ-उतारांनी कादंबरी रंजक आणि वाचनीय बनते. संघर्षातून कादंबरीचे कथानक विकास पावत असते. संघर्षाशिवाय कोणतीच कादंबरी होऊ शकत नाही. संघर्षामुळेच 'झळ' ही कादंबरी अधिक रंजक आणि वाचनीय बनली आहे असे म्हणता येईल. माणूस हा जन्मत:च श्रेष्ठ नसून अनेक समस्यांशी संघर्ष करून श्रेष्ठ कसा ठरतो हे बाबुराव गायकवाड यांनी शेशूच्या माध्यमातून दाखविले आहे.

लेखकाने 'झळ' या कादंबरीमध्ये शेशूच्या वाट्याला येणारे दु:ख, अपमान, वेदना, जातीयता याविरूद्ध संघर्ष दाखवून त्यातून शिक्षणाची धडपड दाखवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. जीवन जगत असताना शेशूच्या वाट्याला आलेले अनुभव, आईचे कुकृत्य, समाज, माणसांचे दु:ख याविरूद्ध संघर्ष करून विजय मिळविला आहे. लेखकाने कादंबरीची सुरुवात विचारक्रांतीतून करून शेवट आनंदात केला आहे. हा संघर्ष अथपासून ते इथपर्यंत दाखविला आहे. शेशूच्या घरची गरिबी, दारिद्र्य या कारणामुळे अनेक दिवस उपासपोटी राहून शिक्षण पूर्ण करण्याची हिंमत दाखविली आहे. या सर्व परिस्थितीवर मात करून समाजाने शिक्षण घेतल्याशिवाय पर्याय नाही हेच लेखकाला सांगावयाचे आहे. शिक्षणाने माणसाचे जीवनमान उंचावते असा संदेश 'झळ' कादंबरीद्वारे लेखकाने दिला आहे.

शेशूला शाळेत जाण्यासाठी चांगली पाटी ही मिळाली नाही. वडिलांनी आड्यात ठेवलेली फुटकी पाटी देऊन शाळेत पाठवितो. एवढचं नाही तर शेशूला दलित म्हणून सर्व मुलाबरोबर पारावर न बसवता खाली बसवले जाते. हा अपमान सहन करूनही तो न

डगमगता येईल त्या प्रसंगावर मात करून शिक्षणाविषयी असणारी ओढ दाखवून गरिबीवर मात केली हे कादंबरीत दाखविले आहे.

शेशूचे वडील हे अठराविश्व दारिद्रयामुळे, जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचा प्रवास हा काबाडकष्ट करण्यात घालविलेला संघर्ष दिसतो. वडिलांना परिस्थिती दरोडेही घालण्यास लावते.

'झळ' या कादंबरीतील दोन स्त्री पात्रे संघर्ष करताना दिसतात. यामधील रुना ही घरच्या गरिबीमुळे शिक्षण घेऊ शकत नसते. पण त्यावर मात करण्यासाठी रुना आठवड्यातील दोन दिवस रानात काम करून शिक्षण घेताना दिसते. तसेच देविदास हा तिला एकटीला पाहून अन्याय करीत असताना रुनाने त्याच्या गालावर दिलेली चापट यामधून संघर्ष दिसतो.

तसेच रुनाची आई जमुना ही देखील घरच्या दारिद्रयावर खंत व्यक्त करून न बसता काबाडकष्ट करून जीवन जगताना दिसते. आणि विशेष म्हणजे तिचा पती आण्णा मरण पावल्यामुळे विधवा होते. याचे दु:ख न बाळगता आपल्या मुलीचे पुढील आयुष्य सुखात जावे यासाठी अनेक कष्ट उपसून परिस्थितीवर मात केली आहे. यातून तिच्यात असणारी दूरदृष्टी दिसते. हा तिचा जीवनाचा प्रवास संघर्षातूनच होतो.

**संघर्ष :**

'आग' या कादंबरीत बाबुराव गायकवाड यांनी संघर्ष हा मुद्दा समर्थपणे मांडल्याचे दिसून येते. संघर्षाचा मुद्दा मधू या पात्राच्या माध्यमातून उभा करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. 'आग' या कादंबरीतील मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव द्यावे याकरीता दलित लोकांनी दिलेल्या लढ्याचे महत्त्वपूर्ण वर्णन आलेले आहे. सवर्ण व दलित एकमेकाविरूद्ध जिद्दीने कंबरा कसून लढत होते. प्रत्येकजन कसली तरी

'अस्मिता' जपण्याचा प्रयत्न करीत होता. आणि त्या अस्मितेपोटी प्रत्येक माणसांचा बळी जात होता. सगळा मराठवाडा जणू रणांगण बनला होता असे नामांतर होत असताना लढ्याचे वर्णन लेखकाने यथोचित केले आहे.

निशाही मधूच्याच वर्गातील. त्याला ती आधुनिक बुद्ध म्हणून चिडवते. पण त्याच्याकडे लक्ष न देता मधू पुढे निघून जातो. ह्याच निशा मुलीचा आधार घेऊन डावरे मधुला मारतात. त्यावेळी त्याने त्यांना केलेला प्रतिकार हाही मधूचा संघर्ष होता.

सरुने मधुला पाठविलेल्या पत्रातून देखील संघर्ष पहावयास मिळतो. पाटील हा सरुवर अन्याय करीत असताना सरुने त्याला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तिने त्याच्या दंडाचा कडाडून चावा घेतला व पाय माऱ्यासाठी तिने लाथा झाडलेल्या आहेत. यावरून सरुने होणाऱ्या अन्यायांविरूद्ध संघर्षच दिला आहे असे म्हणता येते.

धावडी गावातील दलित लोकांनी ग्रामपंचायत धावडीच्या नावे पिण्याच्या पाण्याचा अर्ज केला. कारण सवर्ण लोक दलित लोकांना पाणी देत नव्हते. यासाठी त्यांनी पाण्यासाठी अर्ज देणे म्हणजे एका अर्थाने पाण्यासाठी दिलेला संघर्षच पहावयास मिळतो.

मधूचे वडील जगण्यासाठी कुणाचीही जनावरे राखून पोट भरतात. हा त्यांनी दिलेल्या जीवना विषयीचा संघर्ष म्हणावा लागेल. अशा तऱ्हेने 'आग' कादंबरीत संघर्षाचे जागोजागी वर्णन आलेले आहे.

## 'झळ' मधील संवाद :

संवाद हा कोणत्याही कादंबरीतील महत्त्वाचा घटक मानला जातो. संवादातून व्यक्तिचित्रणे आपल्या डोळ्यासमोर हुबेहूब करण्याचे सामर्थ्य संवादामध्ये आहे. या घटकामुळेच कादंबरीतील पात्रे उठावदार दिसतात. याची कादंबरीचे कथानक गुंफण्यास

मदत होते. संवादातून कादंबरीतील व्यक्तिमधील गुण,दोष समजून येतात. कादंबरी ही संवाद या एकमेक घटकामुळे विकास पावते. 'कादंबरीतील पात्रांनी जसे बोलले ती वाक्ये संवादामध्ये येतात.'

शेशू शाळेला जात असताना चिमी त्याला बोलाविण्यासाठी येऊन म्हणते, त्यावेळचा संवाद पुढीलप्रमाणे आला आहे.

''चल की रं शेश्या.

'कुठ गं ?'

'मी जाईन तिकडे.... तुला शाळा दाखवते....'

'अग पार बसायला भारेगं नाही की मला'

'मी बसू देईन की रं भोरग्यावर... आपन एक, दोन काढीत बसू'

'अग पर, तू काल बी शाळेत गेली होतीस की !

माझ्या पुढं असशील ?.......

नाही रं ! काल एक, दोन, दोन तरी कुठे गिरविले'.....।''[२०]

वडील आई (रंभाशी) शी बोलताना म्हणतात –

'रंभे ! तुही लेकरांना सांगून शिकवू नय गं ?'

आम्ही रात्रंदिन लोकांच्या दावनीला पडून असतोय. पोराकडे कसे लक्ष द्यायचे ?'

बाबा मालकाविषयी बोलताना म्हणतात, 'जी आलो मालक' उठत बाबा बोलले, आयला ह्याची बैलं कुठंतरी लांब नेहून शिन्या कापायलाच पाहिजेत. लईच तोऱ्यात येतूया.

'अवं, ऐकलं, बाहेरचं उभा हाय जणू ? असं रंभा म्हणताच असू दे त्यो मालक हाय नं ? म्या तेचा नोकर हाय. तेस्नीस हाताखाली राबविणार काय समजलीस ?

सोमी आईशी गरिबीविषयी म्हणते –

'कोण्या जन्मीचा शाप म्हणून आपण भिकारी झालोत गं माय !' म्हणून सोमी आईला बिलगली होती. त्यावर रंभा म्हणते, तुझ्याच पायावर गरिबी आली. तू जन्मलीस न दारातील जनावराची दावन आखाडात पटापट मेली. द्वाड कुणीकडची ?

मनाचा पक्का निश्चय करीत मी रुनाला म्हणालो, "मी आतापर्यंत दु:खाची झळ सोशीत आलो आहे. विस्तवाच्या धगीपेक्षाही दु:खाची झळ माझे जीवन जाळीत गेली. तू म्हणतेस, तर मी जगण्याचा विचार करतो."[२१]

"एवढं शिकूनही नोकरी मिळत नाही. आपण कशावर जगायचं रुना ? तरारलेल्या बाह्यावरून हात फिरवीत मी विचारले."[२२]

हाताने बाजूचा अंदाज तर घेतलासं ! आपले हात दणकट असताना विचार करण्याची गरज काय ? दोघांचे हात सरसरु हालू लागले. म्हणजे कशाला काही कमी पडायचे नाही असे रुना म्हणते. त्यावेळी जगण्याची उर्मी येते. आपण कशातही कमी न पडता आपल्या हाताच्या बरोबर कोणतेही काम करू. जीवन जगत राहूया. हा एक वेगळाच संदेश या संवादातून दिसतो.

आतापर्यंतच्या दु:खाची झळ कमी करण्यासाठी समाजातील कठोर रुढींना तोंड देवून तोडण्यासाठी आम्ही रुनाच्या घरी आलो होतो. 'आम्ही एकमेकांना पसंत केलयं ? आता आम्ही लग्न करणार.'

'लाखो वर्षापासून चालत आलेल्या खालच्या वरच्या पायरीला आम्ही जपणार नाही. हीच आमची एकजूट आहे. आमच्या मागून येणारी बालके पूर्वग्रह सोडून चांगले वागतील ? अशा या संवादामधून लेखकाने दोन मने एकत्र आल्यानंतर जात पात हे येवू न

देता आम्ही आमचे जग निर्माण करून एक समतावादी दृष्टिकोन दिला आहे.' यामधून माणसाकडे बघण्याची दृष्टी किती विधायक आहे हे समजते.

**'आग'मधील संवाद :**

संवाद हा कादंबरीतील महत्त्वाचा घटक असून यामुळे 'आग' कादंबरीला एक भारदस्तपणा निर्माण झाला आहे आणि कादंबरीला एक उठावदारपणा निर्माण होऊन वाचनीय बनली आहे.

मधू आणि बन्सी आपल्या भुकेचा प्रश्न मिटविण्यासाठी युक्ती लढवून सवर्णांच्या मुलांची भाकरी बाटवून भुकेचा प्रश्न मिटवितात. पण एके दिवशी भाकरी बाटविली म्हणून बन्सीला मारत असताना तेथे भांडणे सोडविण्यासाठी सत्तारचाचा येथे येतो. त्यावेळी सवर्ण मुलांचा व सत्तारचाचा संवाद –

भांडण सोडविणाऱ्या सत्तारचाचाने पोरं शांत होत असल्याचे बघून बोलायला सुरुवात केली.

''तुम्ही रोज शाळेत जाता नव्हं का ?''

''होय.''

''शाळेत गुरुजी असंच भांडायला शिकवतात का ?''

''नाहीबा,'' कुणाचा तरी दबा आवाज.

''मग का भांडत व्हताव ?''

''सत्तारचाचा तुम्हाला काय ठावं न्हाय, हा महारगा रोजच भाकरी बाटवू लागला, तर आम्ही काय उपाशी राह्यचं व्हय ? नळावर पाणी पण आमच्या अगुदर पित्यात शाळा असत्ये. म्हणून तिथं आम्हास काई म्हणता येत न्हाई, आम्ही गप्प बसतो. म्हणून म्हारडे

लई माजल्याती,'' सखा तावातावाने बोलत होता. सर्वांकडे बोटे दाखवून सत्तारचाचांनी विचारलं, 'तुमच्या सगळ्यांची कोणची जातहाय ?'

जयजयकार करावा त्याप्रमाणे ते जोरात ओरडले, ''मर्द मराठा''

''शाळेत तुम्ही रोज प्रार्थना तर म्हणतच असाल ?''

''म्हणतो की,''

''कोणाची ?''

''जनगणमन ! ही''

''आणखी दुसरी कुठली ?''

''भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत.''

''पुरं पुरं तुम्ही मर्द मराठे अन अन् हे दोघेजन कोण रं ?''

''ते महारामांगाची हायती हो.'' सर्वजण ओरडले.

''ते आपल्या देशात राहत नाहीत का ?''

''राहतात की.''

''मंग ते भारतीय ना ?''

''व्हयं.. व्हयं..''

''सारे भारतीय माझे बांधव आहेत, अशी तुम्ही रोज प्रार्थना म्हणता तर मग हे दोघेजण तुमचे बंधू व्हत नाहीत का ?''

''त्या अर्थानं व्हतात की, नाही कोण म्हणतया ?''

''तुमच्या स्वत:च्या भावाने भाकरी बाटवली तर मारता का ?''

''नाही बा.''

''बन्सीला कसं मारलंत ?''

''तो आमचा स्वत:चा भाऊ थोडाच हाय ?''

''देशबांधव तर हाय का न्हाय ?''

''ते कवा न्हाई म्हणतोय. पर आमच्या घरची मोठी माणसं यांना शिवून घेत न्हायती. म्हणूनशान आम्हीपण शिवू देत नाही.''

''अरं बाबा, तुमचं आईबाप कुठं शाळा शिकल्यात ? तुम्ही शिकताव का न्हाई ? ते हॉटेलात तरी जात्यात का ? तुम्ही शाळेत जाता, हॉटेलात जाता. जत्रेत जाता, खाऊ नये ते खाता.'' त्याबरोबर पोरं ओरडली, ''हे मातूर सत्तारचाचा लईच झालं, बरका, आम्ही हॉटेलात गेला तरीही डबलरोटी-भाज्याबिगर दुसरे काईच खात नाही.''

''डबलरोटी तरी खाताच ना ?''

''हो खातो की, त्यात काय चोरुन ठेवायचंय.''

''ती कोण करते ? कोण आणून देतं ? हे तुम्हाला माहिती असतं का ?''

''नाही बा.''

''मोठमोठ्या शहरामंधी हॉटेलात वाढण्याचं काम करणारी महारामांगाचीच माणसं असतात. स्वयंपाकाला पण त्येंच्याच बाया असत्यात अन् डबलरोटी, अंडी, डालड्याबिगर होत नाही.''

''मग अंड्याला काय व्हतंय ? अंडी तर आम्ही बी खातो.''

''आता तुम्हीच काय, वाणी बामनबी अंडी, मटन खाया लागल्यात. आता जमानाच बदललाय बेटो ! चरबी मिसळल्याबिगर डाललामस्त लागत न्हाय म्हणतात.''[२३]

मुलांचा आणि सत्तारचाचांचा संवाद ऐकताना मधूचा चेहरा कमालीचा फुलला होता. तो त्यांचा एकेकशब्द काळजात साठवून ठेवत होता. सगळी पोरं आता चाचाचे व्याख्यान गुपचूप ऐकत होती. ''पैसे देऊन हॉटेलात मात्र बाटलेले अन्न चवीने खाता, वर पाणी पिऊन ढेकर देता अन इथं बिचाऱ्या बन्सीचा चुकून धक्का लागला, तर डरने त्याला

जनावरासारखं मारलंत ? काय म्हणावं तुम्हाला ? आम्हा आडाण्याला शिकून सवरुन तुम्ही चार समजुतदारपणाच्या गोष्टी सांगायच्या सोडून, जुन्या गोष्टी मनात ठेवून डोकी फोडायची ऽ तुम्ही पोरात पोरं तरी चांगली राहा. तुमच्या म्हाताऱ्यांना आता कसे वागायचे ते त्यांनी ऐकून घेतले, तर सांगा. नाही ऐकले तर समजावून सांगा. पर डोक्यात राख घालून कलागती करू नका.''[२४]

गावातली पोरं आता पूर्णपणे हिरमुसली झाली. सत्तारचाचा पुढे काय बोलावे, तेच त्यांना कळत नव्हते. ''सत्तारचाचा, आम्ही बन्सीला मारणार नाही, त्याने आमची भाकरी बाटवली तरी हॉटेलात खातो, तशीच खात जाऊ.''[२५] खालच्या मानेने सर्वजण बोलले. सत्तारचाचा आल्यामुळे आपला मार वाचला, याचा मधुला आनंद झाला. पण त्यामुळे यापुढे बाटलेली भाकरी आपणास मिळणे बंद होणार, म्हणून वाईटपण वाटले.

**भुकेचे वर्णन :**

दलित कादंबरीत शरीराच्या भूकेपेक्षा पोटाच्या भुकेला अधिक महत्त्व होते. भुकेची जाणीव ही विश्व जाणीव आहे. भूक माणसाला कोणतेही कृत्य करायला भाग पाडते. भूकेने व्याकूळ झालेल्या स्त्रीला कधी कधी देहविक्रयही करावा लागतो. त्यांना सतावणारी भूकच या गोष्टीच्या मुळाशी असते. भूकेपुढे सर्व तत्त्वज्ञान थिटे पडते. त्यामुळेच भूकेची जाणीव दलित कादंबरीत प्रामुख्याने प्रकट झालेली दिसते. याला बाबुराव गायकवाडही अपवाद नाहीत. भुकेच्या वणव्यात होरळपणारी माणसे वेळप्रसंगी चोरी, दरोडेखोरी करण्यास प्रवृत्त होतात.

गरीबांची माणसे टोपलीच्या टोपली तरवड्याची भाजी खुडून आणीत होती. जनावरांनीही ढुंकून न पहावी अशी भाजी खाऊन लोक जगत होते. ढगावर ढग येत व तसेच निघून जात. पावसाचे नाव ही घेत नसत. उन उन्हाळ्यासारखे पडलेले. कमालीचा उकाडा होत असे. आकाशाकडे डोळे लावून शेतकरी बसलेले होते. वैरणकाडी संपवून

गेल्यामुळे जनावरांचे हाल होत. रोज एक दोन तरी जनावरे मरत. महारा-मांगांच्या म्हाताऱ्या गुपचूप आणून खात व कसातरी आलेला दिवस काढीत. या जनावरांप्रमाणे एखाद्या दिवशी जावं लागणार होत. याची कल्पना असूनही त्या म्हाताऱ्या भुरदाडखात.

गोरगरीबांच्या भुकेने आतडी कुरतडू लागली व ते जमीनदाराच्या पाया पडू लागले. 'आम्ही कोणतेही काम करून फेडू. पण आम्हाला खायला द्या.' म्हणून गरीब धरणे धरू लागले. कोणी काही देईना तेव्हा हैराण होऊन गावातील महार-मांगांची तरुण माणसे एकत्र आली. आपण असंही उपाशी मरतो. मग तसं तरी मरू. साधलं तर साधलंच. गावामध्ये एकदोघांच्या घरी रात्री घुसून जे जे आहे ते काढू. धोंडू दिमाख्याचं नाव सर्वांनी एकमुखानं मान्य केलं. वारं पिऊन सर्वानी तो दिवस घालविला.

आषाढीचे दिवस होते. दोन वर्षापासूनच पाऊस अपुरा पडत होता. रुपयातले सहा आणे सुद्धा पीक येत नव्हते. दरवर्षी धावडीचा भाग दुष्काळी म्हणून गणला जात होता. आषाढाचा महिना असूनही कोरडा जात होता. महारा-मांगांची माणसे आंब्याच्या कोया भाजून किंवा उकडून खात येणारा दिवस घालवत होती. चारापाण्यामुळे जनावरे पटापट मरत होती. चार आठ दिवस भूक सहन करणारी महारामांगांची माणसे व लेकरे मृतमांस खंडावर तुटून पडत होती. मांसाने पोट भरण्यास जनावरे रोजच थोडी मरतात ? दुष्काळ पडून माणसे मरतात. म्हणून दुष्काळाला माणसं शिव्या घालत होती व तीच माणसे देवाने जनावरे मारावीत, म्हणून देवाची प्रार्थना करीत होती.

मधू व बन्सी पोटाच्या भुकेसाठी युक्ती लढवतात. एके दिवशी बन्सी मधुला म्हणाला, "गावातल्या पोरांकडे भाकरी असल्यास ते आपणास शिवून घेत नाहीत ना ?" "आपून एकेका दिवशी एकेकाला शिवू म्हंजी ते आपली भाकरी आपणास देऊन टाकतील" हा विचार मधुलाही पटतो. व तसे करण्यास सुरुवात करतात. पण सकाळच्या

वेळी असे करून हा डाव त्यांच्या अंगलट येऊन बन्सीला मार खावा लागतो. असा भुकेचा प्रसंग आलेला आहे.

सित्याबापू म्हणतो मुलगा आजारी पडला होता. त्याच्याकरीता लहानगा लईच अंथरुण धरून पडलाय. रानात, त्येंचं कुणीबी नव्हतं. आज इचारुन त्येनी पिलं बी नसतं. घरात दाणा न्हाय म्हणूनशान पाणी पिईल, म्हणूनशान चारचं कणसं काढली होती. म्या लगेच असं कोणचं धन घेऊनशान चाललो व्हतो. कणसं काढून घेतल्यावर बी गचांड्या देताय. काय काम व्हतं ? आणखी वेगवेगळ्या प्रश्नाला दलित लोकांना तोंड द्यावे लागते.

या कादंबरीचा केंद्रबिंदू असलेल्या मधूच्या संभूला देखील भुकेला तोंड द्यावे लागते. संभू हा कुणब्याची जनावरे राखून येईल त्या घास-तुकड्यावर दिवस ढकलत असत. भाकरीआणलीया, भात व्हईस्तोवर खा, मग तवर तांदूळ चुकीवर चढवतो, म्हणत संभूने त्याच्याकडे ताट सरकावले. जर्मन ताटलीतील भाकरी हातात घेतली व तो तिच्याकडे बघत राहिला. कागद तरी या भाकरीपेक्षा जाड असतो. त्याने कोरड्याशाचा तांब्या उचलून कोरड्यास ढवळले आणि परातीत ओतले. ताटात नुसते पांढरे फुलक पाणी पसरले होते. आता उडी मारुन सुद्धा डाळीचा कण सापडला नसता. नोकराचाकरांना वागवण्याची रीत मधुला माहित होती. भाकरीचा तुकडा समोरच्या ताटातील कोरड्याश्यात बुचकाळून त्याने तोंडात घातला, पर कसलीच चव त्याला लागेना.

**जातियतेचे वर्णन :**

दलित कथा, कादंबरीमधून अनेक ठिकाणी जातीयतेचा उल्लेख आलेला दिसतो. त्या पद्धतीने 'झळ' मधून देखील लेखकाने जातीयतेचा प्रश्न मांडलेला आहे.

भाऊ मिलेटरीतून आल्यावर सुताराच्या गल्लीमध्ये फिरत गेला.आपल्या गावातील उमाकडे फिरत गेला. भाऊला जेवायला बोलावले. कालवणाने भरलेले मातीचे भांडे उमाच्या बायकोने भाऊपुढे ठेवले. भाऊला एकदम मारल्यासारखे झाले. अजून बाट, शिवाशिवी आपल्या गावची गेली नाही हे जाणून तो न जेवताच घरी आला. या प्रसंगावरून भाऊला भयंकर चीड आली. अनेक वर्षापासून आलेली जातीयता गेली नाही याचे भयंकर भाऊला दुःख होते.

या कादंबरीत आणखी एक जातीयतेचे उदाहरण म्हणजे शेशू व रुना हे एकाच जातीतील आहेत. तरीदेखील शेशूचे वडील म्हणतात, 'रांडीच्या खालच्या पायरीच्या पोरीबरोबर असं खेळतुयास ?' तेव्हा छोटा शेशू मनात म्हणतो, ''पायऱ्या तरी कुठचं दिसत नव्हत्या. मग वरची पायरी व खालची पायरी, असं काय म्हणत होते?''[२६] यावरून जाती अंतर्गत देखील जातीयता किती असते हे पहावयास मिळते.

दलित कादंबरीमधून जातियतेचा प्रसंग हा असले कारण भारत देशामध्ये वर्णव्यवस्था ही जातिव्यवस्थेला कारणीभूत आहे. त्यामुळे दलित लेखकाला जातीच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागत असल्याने जातियतेचे वर्णन कादंबरीमध्ये येत असताना दिसते.

मधू धावडीला गेल्यानंतर आंघोळीला नदीला जातो. त्यामुळे माणिकदाची जनावरे पाणी गढूळ करतात. म्हणून जनावरे लांबून घेऊन जावा म्हणून सांगताना माणिकदा म्हणतो, ''आण तू कोण रं ?''

''मी मधू नव्हका ?''

''मी कोणच्या मधू का फदूला वळखत न्हाय.''

''कुणाचा मधू म्हणालास ?''

''संभूचा नव्ह का ?''

"संभूचा म्हणजी मांगाच्या संभूचा म्हण की ? मधू सांगतुयास. मध्या म्हणाला असतास तर वळकलं नसतं का ?"

माणिकदाच्या बोलण्याचा मधुला राग आलां, पण त्याच्या वयाकडंबघून तो गप्प बसला.

'तुमच्या लोकासाठी खालचा टिटवीचा डव्ह हाय,ते तुला ठावं न्हाय का ?' असे हे जातियतेच्या घटनेला मधुला तोंड द्यावे लागते.

'आग' कादंबरीत दलितादलितांतील उच्चनीचता देखील पहावयास मिळते. मधू हा मांग जातीतील आहे व तो सरुचा महार जातीतील मुलींच्या घरी अभ्यासाला व वारंवार सहवासात असायचा त्यावेळी संभू आपल्या मुलाला म्हणजे मधुला म्हणतो, "इला न माळ त्या पोरटीच्या घरी काय गठुडं असतंय रं ? म्हारडे पोरगी तुह्या गळ्यात बांधायचे ! तिथं जात येत जाऊ नगसं !" तसेच महारवाडा व मांगवाड्याच्या मध्यभागी महारानी सरकारी पैशाने आड खणला होता. त्याला पाणी मुबलक होतं. आड महारांचा म्हणून कोणताच मांग पाणी अजून पीत नव्हता. जरी मांगाच्या आडाचे पाणी आठले व त्यासाठी दोन-दोन मैल पायपीट करावी लागली तरी बेहत्तर.

मातंग समाजाची संघटना स्थापन करण्याकरीता प्राचार्यांकडे जाणाऱ्या मधूच्या शर्टाचे बटण तुटले होते. त्यातून फाटका गंजिफ्रॉक डोकावत होता. त्याकडे बोट दाखवून प्राचार्य म्हणाले, "तुला डफडी वाजवता येते का ?" 'हेकटाणा चालवू नको' असे उत्तर दिले जाते.

यावरून शिक्षण घेऊन देखील त्याची दलितांच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलेली नाही असे जाणवून येते. अशी अनेक जातियतेची वर्णने 'आग' या कादंबरीत बाबुराव गायकवाड यांनी मांडली आहेत.

**निवेदन :**

'झळ' या कादंबरीतील निवेदन हे शेशूच्या माध्यमातून करताना लेखकाने अनेकवेळा 'मी' असा उल्लेख केलेला आढळतो.

बाबुराव गायकवाड यांनी या कादंबरीचे निवेदन हे 'Flash back' पद्धतीने केले असल्याने एक वेगळाच परिणाम वाचकावर करते. इथे लेखक आपली निवेदकाची भूमिका सोडून देऊन थेट 'मी'च्या माध्यमातून निवेदन करतो. त्यामुळे वाचक थेट लेखकाच्या अंत:करणाशी भेदू शकतात. लेखकाने 'मी' च्या भूमिकेतून शेशूच्या जीवनता आलेले सुखद दु:खद प्रसंग कसलाहीआडपडदा न ठेवता सादर केलेले आहेत. 'मी'ला केंद्रित करून त्याच्या भोवतीच अनेक प्रसंग व घटना लेखकाने फिरविल्या गेल्या आहेत.

बाबुराव गायकवाड यांनी संपूर्ण कादंबरीत मधू या पात्राच्या माध्यमातून सविस्तर कथन केली आहे. मधू हा उमापूर या गावी कॉलेजला असताना त्याला अनेक व्याख्याने ऐकावयास मिळतात. त्याचे मन आपल्या गावच्या विकासाकडे वळते. त्यासाठी तो आपल्या गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती व सरुवर झालेल्या अन्यायाचा बदला घेण्यासाठी गावी येतो.

सरुवर झालेला अत्याचार, बलात्कार तिच्याच पत्रावरून कळतो. सरु जितकी अगतिक तितकाच या घटनेने कोलमडणारा मधूही तसाच अगतिक. त्याची घुसमट लेखकाने संयमाने वर्णन केलेले आहे. पत्र घेऊन मधू सरांकडे जातो. महात्मा गांधीजी 'खेड्याकडे चला' असे सुचवितात. निशा एक काळीसावळी, काहीशी नखरेल मुलगी मधुला आधुनिक बुद्ध म्हणून हिणवते. तिच्यावरून मधुला झालेली डावरे यांच्याकडून मारहाण सरुचे प्रकरणा मधूमुळे अंगलट येईल, म्हणून त्याच्याविरूद्ध प्राचार्यांकडे तक्रार करणारा कातकर हा अनेक लोकांना नोकरी लावतो, लग्ने लावतो म्हणून लुबाडणारा

असतो. याचा मधुला राग येत होता. मधूचे सरुबरोबर सुखी संसार करण्याचे स्वप्न धुळीला मिळते. दलित समाज अनेक वर्षापासून दुबळाच राहिला ही खंत लेखकाने मांडली आहे. चंदूच्या आईने धगधगीच्या काळात मधुला लपवून त्याची घेतलेली काळजी, पोलीस गाडीतून कातकरांना व पाटील यांना घेऊन जातात. परंतु दलित मधुला न्याय कुठे मिळतो ? त्यांच्या मनातील 'आग' तशीच राहते. मधूने दिलेला सवर्णांना लढा व आपल्या समाजातील लोकांनी सुधारण्यासाठी केलेली धडपड मधूच्या निवेदनात मांडली आहे.

**वातावरण :**

वातावरण हा कादंबरीचा पुरक घटक आहे. या घटकामुळेच कादंबरीला आगळे वेगळे स्वरुप प्राप्त होण्यास मदत होते. वातावरण हा कादंबरीचा पोषक घटक असल्यामुळे एखादी घटना किंवा प्रसंग आपल्या डोळ्यासमोर हुबेहुब करण्यास मदत करतो. या घटकावरच कादंबरीची खरी यशस्वीता अवलंबून असते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. यामुळेच एखादे ग्रामीण खेडे आपणासमोर जसेच्या तसे उभे करण्याचे सामर्थ्य या घटकामध्ये सामावलेले असते. प्रसंगाच्या आधारे सखोल असे खेड्याचे वर्णन लेखक दाखवित असतो. प्रसंगाला साजेसं रुप देण्याचे कार्य हा घटक करीत असतो.

बाबुराव गायकवाड यांनी धावडी या गावचे वर्णन कादंबरीला साजेसंअसचं केलेलं आहे. धावडीहा गाव छोटासाच पण टुमदार गाव. एका बाजूला ढेंगणासा डोंगर, पावसाळ्यात तो हिरवागार होई. छोट्या मोठ्या पाच-सहा नद्या डोंगरातून वाहत. त्यामुळे वर्षभर थोडेतरी पाणी असायचे. दोन-तीन मोठमोठे खोलगट डोह होते. मित्रासोबत तो मनसोक्त डुंबायचा. फळाच्या मोसमात सीताफळे, करवंद, बोरं, बिब्याची फुले, कारं इत्यादी रानमेवा अमाप मिळायचा. 'महारवाडा व मांगवाड्याच्या मध्यभागी महारांनी सरकारी पैशाने आड खणला होता.'

गावापासून डोंगर जवळजवळ एक मैलभर होता. पाणंदीच्या वरच्या बाजूला सवर्णांची व खालच्या बाजूला महार व मांगांची घरे होती. गावाला तटबंदी असली, तरी पाणंदाने गावकुस मजबुत केला होता. महारवाडा व चांभारवाडा धावडीच्या दक्षिणेस सुमारे अर्ध्या फर्लांगावर होता. गाव वसविण्यास चांगलेच डोके वापरले होते. या वर्णनावरून ग्रामीण भागातील खेडे आपल्यासमोर लेखकाने आपल्या कौशल्याच्या आधारे साकार केले आहे.

## प्रतिमा, प्रतिक आणि वाक्प्रचारांचा समर्थ वापर :

'झळ' आणि 'आग' या कादंबरीमध्ये बाबुराव गायकवाड यांनी प्रतिमा, प्रतिक आणि वाक्प्रचारांचा योग्य त्या ठिकाणी वापर केलेला आहे. साहित्याच्या व्यवहारात या घटकांचे अनन्यपूर्ण स्थान आहे. लेखकाने अनेक प्रतिमा, प्रतिक, वाक्प्रचारांचा वापर करून कादंबरीला एक आगळे वेगळे स्थान प्राप्त करून दिले आहे.

चाबरेपणा करणे, तळपायाची आग मस्तकात शिरणे, खजिल होणे, सावळ पाडणे, तिळभर अंतर न देणे, लाखोली वाहणे, हाडाचे पाणी करणे यासारख्या अनेक वाक्प्रचारांचा वापर केला आहे. गाड्याबरोबर नळ्याचीही जत्रा, जित्याची खोड मेल्याशिवाय जाणार नाही यासारख्या म्हणी कादंबरीत आढळतात. तसेच काही प्रतिमा, प्रतीकांचाही उपयोग केलेला दिसून येतो. रात्रीला पिठासारखे चांदणे पडणे, सोमीच काही ती अडगळ, तळलेल्या पापडावर ताव मारणे इ. घटकामुळे कादंबरीला आकार घेऊन विकास पावलेली आहे.

## सारांश :

'झळ' या कादंबरीमधून बाबुराव गायकवाड यांनी एका दलित कुटुंबाची दयनीय अवस्थाच पुढे आणली आहे. शेशू व रुनाच्या माध्यमातून लेखकाने जातीधर्माच्या

पलीकडे जावून विवाहबद्ध झालेले उदाहरण घेऊन मानवतेचा दृष्टिकोन पुढे आणला आहे. शिक्षण घेऊन ही नोकरी मिळत नाही. आपण कशावर जगायचं गं रुना ? असा प्रश्न रुनापुढे आणतो. या प्रसंगी रुनाने दिलेले मत असे की, 'आपले हात दणकट असताना विचार करण्याची गरज काय ? दोघांचे हात सरसर हालू लागले म्हणजे कशाला काही कमी पडायचे नाही.' असा हा एक वेगळाच आदर्श वाचकासमोर लेखकाने ठेवला आहे. अशा अनेक उदाहरणाने कादंबरी बहरलेली आहे.

बाबुराव गायकवाड यांनी 'आग' या कादंबरीत शाळत जाणारा मांगाचा लहानसा मधू पुढे शिक्षणाकरीता एकटाच धावडी सोडून उमापूरला जातो. आंबेडकरांचा वैचारिक वसा घेऊन आपल्या खेड्यात पारंपरिक दलित समाजात परिवर्तन करण्याचा अनेक दृष्टीने प्रयत्न करतो. आपल्या समाजातील पाण्याची असेल, कुणावरील होणाऱ्या अन्यायाची असेल, शिक्षणाविषयीची असेल अशा अनेक अडचणीवर मात करण्याचा प्रयत्न मधू समाजाला घेऊन करीत असतो. मधू शिक्षणाने व विचारोन प्रभावित होऊन समाजात परिवर्तन करण्याचा मनापासून प्रयत्न करताना दिसतो.

आपल्या गावाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करण्यासाठी व सरुच्या प्रकरणाचा बदला घेण्यासाठी आलेला मधू वेगळ्याच आगीत तापून, सुलाखून व व्यथित होऊन उमापूरला चालला होता. अशा पद्धतीने कादंबरीचा शेवट झाल्याचे दिसते.

**समारोप :**

अशा प्रकारे बाबुराव गायकवाड यांनी 'झळ' या कांदबरीतून दलितांच्या दु:खाचे वर्णन केल्याचे आढळून येते. कादंबरीच्या पानापानातून दलित जीवनाचे जिवंतचित्र उभे करण्यासाठी लेखक यशस्वी झालेला आहे. या कादंबरीत शोषितांच्या आधारहीन जीवनाचा उच्चभ्रू लोकांनी फायदा घेतलेला आढळतो. घरची गरिबी असताना सुद्धा शेशू सारखा मुलगा त्यावर मात करून उच्च शिक्षण घेऊ शकतो. हे दाखविण्याचा प्रयत्न

केलेला आहे. एका दलित कुटुंबाची एका बदफैली स्त्रीमुळे कशी परवड होते ते या कादंबरीत दिसून येते. अनेक गोष्टींना स्पर्श करण्यास ही कादंबरी यशस्वी झाली आहे.

'आग' कादंबरीमध्ये लेखकाने एका सुशिक्षित व विचाराने भान आलेल्या तरुण मुलाच्या निवेदनातून उलगडली असून त्याने समाजात परविर्तन घडविण्यासाठी केलेले प्रयत्न, मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाव द्यावे यासाठी झालेला संघर्ष,दलित दलितांतील संघर्ष, सरुवर झालेल्या अन्यायाचा जाब विचारण्यासाठी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करणयासाठी धावडीला येतो. अशा अनेक प्रसंगाचे चित्रण लेखक बाबुराव गायकवाड करण्यात यशस्वी झाले आहेत. असे म्हटले तरी वावगे होणार नाही असे मला वाटते.

पुढील प्रकरणात'झळ', 'आग' याकादंबऱ्यांच्या अभ्यासातून आशय, अभिव्यक्तीच्या अनुषंगाने जाणवलेले विशेष दलित कादंबरी म्हणून जाणवलेले विशेष मर्यादा लक्षात घेऊ.

-----

## संदर्भग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | 'झळ' | : | बाबुराव गायकवाड, प्रकाशक – सुरेश राऊत, मुंबई, प्रथमावृत्ती, मार्च, १९८०, पृ. ३४. |
| २) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.८. |
| ३) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.१४. |
| ४) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.१५. |
| ५) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.४७. |
| ६) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.५७. |
| ७) | 'आग', | : | बाबुराव गायकवाड, मंजुल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९६,पृ. ९४. |
| ८) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.९४. |
| ९) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.९४. |
| १०) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.१०१. |
| ११) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.५०. |
| १२) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.९०. |
| १३) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.१०४. |
| १४) | 'झळ', | : | बाबुराव गायकवाड, पृष्ट क्र. ३९. |
| १५) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.४०. |
| १६) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.८. |
| १७) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.२४. |
| १८) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.६६. |

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.११३-११४. |
| २०) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.५. |
| २१) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.७३. |
| २२) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.७३. |
| २३) | 'आग', | : | बाबुराव गायकवाड,पृष्ट क्र.३६, ३७. |
| २४) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.३८. |
| २५) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.३८. |
| २६) | तत्रैव, | : | पृष्ठ क्र.८. |
| २७) | तत्रैव, | : | ७२. |

-----